साप्ताहिक ४० पैसे : १४ जानेवारी ६७

# माणूस



लोकशाही
समाजवाद
वि रु द्ध
साम्यवादी
समाजवाद

श्री. ब. मो. पुरंदरे

यांची एक ऐतिहासिक कादंबरी

# शिलंगणाचं सोनं



मूल्य तीन रुपये

राजहंस प्रकाशन पुणे

४१९, नारायण पेठ, पुणे २





## एक समग्र साप्ताहिक

वर्ष : सहावे
अंक : अठ्ठाविसावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**
श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४१९ नारायण, पुणे २.
दूरध्वनी – ५७३५९


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## पत्रमैत्री

स. न. डिसें. ३१

'आम्ही विद्यार्थी आणि आमच्या दंगली' हा कुमार सप्तर्षि यांचा लेख वाचला. लेख विचार करण्यास लावणारा आहे. मी विद्यार्थीच असल्याने मोठ्या आस्थेने तो लेख वाचला. पण पुण्याच्या विद्यार्थ्यांनी पुण्यात राहून उत्तर भारतातील विद्यार्थी दंगलींविषयी लिहिणे खरे म्हणजे चुकीचे आहे. लेखकाने विद्यार्थ्यांची बाजू, केवळ समवयीन नि समव्यावसायिक म्हणून उचलून धरली आहे.

मागच्या पिढीला मदांध-स्वार्थी म्हणून त्यांनी त्या पिढीवर घोर अन्याय केला आहे. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सुखसोयींचा त्याग करून लढा दिला तो त्याच पिढीने त्यांनी आपल्यावर केलेले उपकार एवढ्यात विसरणे कृतघ्नपणाचे आहे. जरी स्वातंत्र्य मिळाल्यावर ते स्वार्थी-मदांध झाले असं म्हटलं तरी तो स्वार्थ कोणासाठी ? ते जोपासत असलेल्या नवीन पिढीसाठीच नव्हे काय ? त्या स्वार्थाला तरुण पिढीच कारण नव्हे काय ? त्या लोकांच्या हातून चुका होतात. त्या गंभीरही असू शकतात. आपण त्या चुका लक्षात घेऊन सुधारल्या पाहिजेत. पण ते देशाच्या उन्नतीसाठी झगडत असताना विद्यार्थ्यांनी आपल्या सुखसोयींसाठी (स्वार्थच नव्हे काय ?) देशाच्या संपत्तीचाच विनाश करावा ? प्रसंग कितीही बाका आला तरी तोल जाऊ देता कामा नये. आपल्या काही तक्रारी असतील तर त्या जरूर मांडाव्या.

पण त्या पुऱ्या होत नाहीत म्हणून दंगे करण्यात काय अर्थ? निष्ठुर अशा ब्रिटिश सरकारकडून भारतीयांनी असहकाराच्या मार्गाने आपल्या मागण्या पुऱ्या करवून घेतल्या. मग आपल्याच सरकारकडून मागणी पुरी करवून घेण्यास हिंसाचाराचा आश्रय का घेतला जावा?

लेखात विद्यार्थ्यांच्या ज्या मागण्या दिल्या आहेत, त्यांतील पहिली वगळता इतर मागण्यांत काहीही तथ्य नाही.

'यूथ ऑर्गनायझेशन' करीत असलेले कार्य खरोखरीच चांगले आहे. मला त्या Organization ची तत्त्वे नि कार्य यांची सविस्तर माहिती मिळू शकेल काय? कुमार सप्तर्षि व त्यांचे सहकारी यांच्याशी आम्ही विचारांची देवाण-घेवाण करू इच्छितो.

**— विजय लिखिते, बोरीवली.**

**स. न.** **डिसें. ३१.**

३१ डिसेंबरच्या 'माणूस' साप्ताहिकात 'आम्ही विद्यार्थी आणि आमच्या दंगली' हा कुमार सप्तर्षी यांचा लेख वाचून समाधान वाटले. या ज्वलंत विषयावर नाना तर्कट विचार सर्व लहानथोर मंडळींनी प्रसिद्ध केले. परंतु खऱ्या नाण्याची दुसरी बाजू कोणीही प्रसिद्ध करण्याची कामगिरी केली नाही. 'माणूस' ने सदर लेख प्रसिद्ध करून 'माणूस' चे वैशिष्टच प्रकट केले आहे, म्हणून आम्ही 'माणूस' चे अभिनंदन करतो.

**—जयराम बडदे,**
**शिवाजी बडदे,**
**संभाजी बडदे, पुणे.**

**स. न.** **जाने. १.**

'यूथ ऑर्गनायझेशन,' पूना या संस्थेचे क्रियाशील सभासद श्री. कुमार सप्तर्षी यांचा साप्ताहिक 'माणूस' ने पुनर्मुद्रित केलेला 'आम्ही विद्यार्थी आणि आमच्या दंगली' हा लेख वाचला. अनेक विद्यार्थ्यांच्या अंत:करणाचा अभ्यास करून, एका विद्यार्थी मित्रानेच हा लेख लिहिल्यामुळे जणू विद्यार्थी पक्षकार समाजरूपी न्यायदेवतेसमोर आपली बाजू मांडून आपली होत असलेली 'अक्षम्य उपेक्षा' यापुढे तरी टळावी, असे आग्रहाने राज्यकर्ते आणि समाजश्रेष्ठी यांना बजावत आहेसे वाटते. विशेषत:, लेखकाने राज्यकर्त्यांना या बाबतीत लेखाद्वारे एक नऊ कलमी सुसंबद्ध योजना सादर करून जे आव्हान केले आहे, ते त्यांना विचार करावयास लावणारे खासच आहे. योजनेतील पहिली तीन कलमे तर अत्यावश्यक आणि निकडीची आहेत. पण सत्तास्पर्धेत गुंतलेले आणि राजकीय सत्तास्थाने हीच देशसेवेची एकमेव साधने मानू पाहणारे (?) आजचे राज्यकर्ते या नऊ कलमी योजनेबद्दल कितपत विचार करतील, याबद्दल शंकाच आहे.

तसेच सार्वजनिक मालमत्तेची नुकसानी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या माथी अराष्ट्रीयत्वाचे खापर फोडणाऱ्यांना— 'पण विद्यार्थी ही कोणाची मालमत्ता?' असा विनतोड प्रश्न विचारून लेखकाने गारच केले आहे. (कारण विद्यार्थ्यांवरही लाठीमार, अश्रुधूर, गोळीबार यांचा उपयोग केला जातो.' एकंदरीत

आजच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात काही निश्चित स्वरूपाचे परिवर्तन करून विद्यार्थ्यांसमोर निर्मळ आदर्शाच्या मूर्ती उभ्या ठाकल्या पाहिजेत, असा लेखकाचा अंतिम सूर असून सद्यःस्थितीत तो अगदी अचूक आहे. विचाराप्रमाणे आचरण करणाऱ्या 'यूथ ऑर्गनायझेशन' च्या कार्यास सुयश चिंतितो.

**मुरलीधर ज. मोरे**
**काकरंबा (जि. उस्मानाबाद)**

तरीदेखील आम्ही काय करावे हे विचार योग्य वाटतात. असे लेखकासारखे ते तेजस्वी विचार असलेले तरुण त्यागी मन आमच्यातून कोणत्या संस्कार व कार्यक्रमाने निर्माण होईल ?

'माणूस प्रतिष्ठान' यशस्वी होवो. येत्या उन्हाळी सुटीत मी मित्रांसह 'प्रतिष्ठानात'त काम करू इच्छितो (इंजिनिअरिंगशी संबंधित काम दिल्यास उत्तम.)

**अशोक भोडक, पुणे**

**स. न.** **जाने. २**

मी इंजिनिअरिंगचा विद्यार्थी, 'माणूस'चा नियमित वाचक. 'माणूस' आम्हा विद्यार्थ्यांकडे (विद्यार्थी परिषदेच्या अधिवेशनाचा अहवाल सोडता) प्रथमच वळलेला असतो. दंगलीवरील लेख खरोखरच सजीव व तळमळीने लिहिलेला आहे. त्यातील काही मतांशी मात्र मी सहमत नाही. लेखात इतरांचे बुरखे जरूर फाडले आहेत. पण आमच्या अंतर्मनाचे दर्शन घडले नाही. "देशाला तुम्ही जेथे नेले तेथे तर निश्चितच नाही," हे जुन्या पिढीला दिलेले उत्तर आवेशपूर्ण असले तरी खरे मात्र नाही! कारण, आम्ही विद्यार्थी म्हणजे मागील पिढीपेक्षाही भोगवादी, भौतिक आचारापलीकडे फारसा विचार न करणारे युवकसमूह निर्माण झालो आहोत. समाजाचे इतर घटक आमच्याविरुद्ध उठले आहेत, असा ग्रह का ? हेदेखील समजत नाही.

**स. न.** **जाने. २**

नेहमीच्या उत्सुकतेने आपला ३१ डिसेंबरचा 'माणूस' पाहिला व क्षणाचाही विलंब न लावता 'आम्ही विद्यार्थी व आमच्या दंगली' हा विचारप्रवर्तक, पुरोगामी व अभ्यासपूर्ण असा लेख वाचून काढला. खरोखर आम्ही माणसांनी आपल्या 'माणूस'चे काय कौतुक करावे. कारण आपण भ्याड वृत्तपत्रे व निकृष्ट साहित्य पुरवून समाजाला पोखरणारी मासिके यांच्यापासून बाजूला ठामपणे सत्याच्या पाठीमागे उभे राहून या लेखाद्वारे विद्यार्थ्यांच्या आजच्या तरुण मनाच्या व्यथा प्रकाशित करून समाजाला वेगळी दृष्टी दिली आहे. 'Youth Organization' च्या तरुण समाजाला बदलत्या काळाची हाक दिली व 'माणूस'ने त्या हाकेला प्रकाशित करून साद घातली आहे.

**गुलाब शेख, सातारा**

# उदासीन धर्मसंस्था आणि बहुजन हित

शंकराचार्यांनी अद्यापही आपले उपोषण सोडलेले नाही आणि त्यामुळे केंद्र सरकार काहीसे अस्वस्थ आहे. उपोषणापुढे सरकार नमणार नाही, असे प्रधानमंत्री इंदिरा गांधी आणि गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी वारंवार जाहीर केले असले तरी असल्या उपोषणांचा दुःखद शेवट व्हावा, असे कोणीच इच्छित नाही. कारण, कितीही आव आणला तरी या दुःखद पर्यवसानामुळे जनमानसात होणारी खळबळजनक प्रतिक्रिया राज्यकर्त्यांच्या दृष्टीने उपेक्षणीय नसते अन् यासाठीच शंकराचार्यांनी उपोषण सोडावे, असे आवाहन सतत करण्यात येत आहे.

परंतु सर्वदलीय गोरक्षा अभियान समितीने इतकी एकाकी व आग्रही भूमिका घेतली आहे की, त्यामुळे शंकराचार्यांचे उपोषण सुटण्याच्या आधी सरकारतर्फे गोवधबंदीबाबत कोणतीही घोषणा करणे सरकारच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने इष्ट ठरत नाही. गोवधबंदीच्या प्रश्नावरून आपण जनमन चेतवू शकू, असा अभियान समितीचा कयास होता. परंतु ७ नोव्हेंबरचे तात्कालिक निदर्शन सोडले तर गोवधबंदीच्या प्रश्नावरून जनता आततायी उपाय योजण्यास तयार होत नाही, असे आढळून आले आहे. एवढे झाल्यानंतर अभियान समितीने प्रधानमंत्र्यांच्या आश्वासनांवर आणि राष्ट्रपतींच्या आवाहनावर भिस्त ठेवून शंकराचार्यांना उपोषण सोडण्याचा सल्ला द्यावयास हवा होता, परंतु अभियान समितीच्या नेत्यांनी आपली मागणी आधी पूर्ण व्हावी, नंतर उपोषण सोडले जाईल, अशी भूमिका घेतली आहे.

## उदासीन धर्मसंस्था

गोवधबंदीच्या प्रश्नास महत्त्व आहे, ते भावनात्मक दृष्टीने. बहुसंख्याक हिंदू समाजाला पवित्र वाटणाऱ्या गायीची हत्या होता कामा नये हा अभियान समितीचा आग्रह निव्वळ लोकशाही दृष्टिकोनातून पाहिला तर रास्त वाटतो. अखेरीस प्रत्येक प्रश्न केवळ उपयुक्ततेच्या कसोटीवरून सोडविता येत नाही. काही वेळ उपयुक्तता बाजूस ठेवून समाज–भावनेला महत्त्व द्यावे लागते. परंपरेचे वा अस्मितेचे रक्षण होते ते अशा आग्रहातूनच. या दृष्टीने या प्रश्नाकडे राज्यकर्त्यांचे लक्ष वेधविणे हा अभियान समितीचा उद्देश होता व तो सफलही झाला आहे, असे असताना अभियान समितीनेही आधी मागणी मान्य करा, ही आग्रही भूमिका सोडून शंकराचार्यांना उपोषण सोडण्याचा सल्ला द्यावा आणि नंतर केंद्र सरकारशी वाटाघाटी करून गोवधबंदीची कार्यवाही शक्य तितक्या लवकर कशी करता येईल या दृष्टीने पावले टाकावयास हवीत. फत्तेसिंगांच्या उपोषण-समाप्तीतून गोवधबंदीच्या पुरस्कर्त्यांनी



कोणता बोध घ्यावयाचा असेल तर तो हाच होय, असे येथील निरीक्षकांचे मत आहे.

गाईचे प्राण वाचविण्यासाठी आपले प्राण पणास लावणारे शंकराचार्य किंवा त्यांची अभियान समिती उत्तर प्रदेश, बिहार आदी आवर्षणग्रस्त भागातील आपल्या देशबांधवांचे प्राण वाचविण्यासाठी कोणतीच सक्रिय मदत करीत नाही, हे पाहिल्या-नंतर परदेशी निरीक्षकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. ते म्हणतात की, बिहार, उत्तर प्रदेशमधल्या उपाशी भारतीयांच्या मदतीसाठी रोममधील पोपनी मदत धाडली आहे आणि या देशातील धर्मसंस्था मात्र या संकटाबाबत उदासीन राहू शकते, या गोष्टीचा मेळ घालणे कठिण जाते. येथील धर्मसंस्था प्राचीन परंपरांचे आणि वैशि-ष्टयांचे रक्षण करण्याचा आग्रह धरीत असताना ती बहुजनसमाजाच्या दैनंदिन गरजांसंबंधी इतकी उपेक्षा वृत्ती बाळगते आणि त्यामुळेच या धर्मसंस्थांमार्फत हाती घेतल्या जाणाऱ्या चळवळीसंबंधी बहुजनसमाजालाही तितकीशी आत्मीयता वाटत नाही. अभियान समितीच्या नेत्यांनी या विवेचनाचा अर्थ जाणून घेतला तर ते त्यांनाच हितकर ठरेल.

## डाव्या गटांचा पराभव

भारतात अन्नधान्यासारख्या अगदी प्राथमिक गरजेच्या वस्तूंचा तुटवडा जाणवत असताना तिकिटांच्या आणि निवडणुकीच्या राजकारणास मात्र उधाण आले याचेही या परदेशी निरीक्षकांना मोठे नवल वाटते. दारिद्र्य आणि राजकारण ही भारतीय जनतेची वैशिष्टये आहेत, असे एका परदेशी वार्ताहराने आपल्या बातमीपत्रात नमूद केले आहे. नेहरूंच्या निधनानंतर होणारी ही पहिली निवडणूक म्हणून तिच्याकडे या वार्ताहरांचे विशेष लक्ष आहे. सत्ताधारी कॉंग्रेसच्या फाटाफुटीची चित्रे ते मोठी खुलवून आपल्या पत्रांकडे धाडत असतात. राजस्थानमध्ये कुंभराम आर्य यांचा गट मोहनलाल सुखाडियांबरोबर दोन हात करण्याची भाषा बोलत आहे तर ओरिसात भूतपूर्व मुख्यमंत्री हरेकृष्ण मेहताब दोन मतदारसंघातून विद्यमान मंत्र्यांविरुद्ध निवड-णूक लढविणार आहेत. उत्तर प्रदेशातील गटबाजी तर इतकी विकोपाला गेली आहे, की उत्तर प्रदेश कॉंग्रेस समितीची बैठक निर्विघ्नपण पार पडणे जवळजवळ अशक्य झाले आहे. बिहारमध्येही भूतपूर्व मुख्यमंत्री विनोदानंद झा जनक्रांती दलाच्या गोटात जाऊन उभे राहिले आहेत. केरळ, आंध्र प्रदेश, बंगाल आदी राज्यांतील परिस्थितीही यापेक्षा वेगळी नाही. या तीनही राज्यांत कम्युनिस्टांचा विशेष जोर असून त्यांनी

इतर विरोधकांना हाताशी धरून काँग्रेसला पराभूत करण्याचा चंग बांधला आहे.

अखेर कृष्ण मेनन हेही काँग्रेसमधून बाहेर पडले असून ईशान्य मुंबई मतदार-संघातून काँग्रेसविरुद्ध निवडणूक लढवीत आहेत.

मेनन यांच्या राजीनाम्याने एक गोष्ट मात्र सिद्ध झाली आहे आणि ती ही की नेहरूंच्या समाजवादी विचारसरणीच्या गटाला काँग्रेस संघटनेत कोणतेही स्थान राहिलेले नाही. केवळ काँग्रेसच नव्हे तर एकंदर भारतीय जनमतही उजव्या गटा-कडे वळू लागल्याचे चिन्ह दिसत आहे अशी कबुली केवळ भारतातीलच नव्हे तर परदेशांतील कम्युनिस्टही देऊ लागले आहेत. काँग्रेसमधल्या डाव्या गटाच्या परा-भवाला चिनी आक्रमणापासूनच प्रारंभ झाला. नेहरूंच्या सतरा वर्षांच्या राजकीय धोरणाचाच तो पराभव होता, असे सामान्यत: मानले जाते. तीन पंचवार्षिक योजना पुऱ्या झाल्यानंतर देशाची आर्थिक स्थिती सुधारण्याऐवजी ती अधिकच बिघडली याचेही खापर नेहरूपुरस्कृत डाव्या गटाच्या अवास्तव आर्थिक धोरणावरच फोड-ण्यात येते. देशांतर्गत प्रश्नही कणखर निर्धाराने सोडविण्याऐवजी तात्पुरती मलम-पट्टी करून ते पुढे ढकलण्याचा नेहरू सरकारचा वारसा इंदिरा गांधींचे सरकारही चालवीत आहे. या सर्व परिस्थितीचा फायदा घेण्याचे मोरारजी देसाई, स. का. पाटील, अतुल्य घोष प्रभृति उजव्या गटाच्या सूत्रधारांनी ठरविले असून देशातील वैफल्यातून का होईना जनमत त्यांच्या पाठीशी गोळा होत आहे हे नाकारता येणार नाही.

काँग्रेस अंतर्गत हा जो झगडा सुरू झाला आहे, त्याचे पडसाद इतर पक्षांतही उमटू लागले आहेत. जनसंघ आणि स्वतंत्र या पक्षांनी बऱ्याच राज्यांत करारमदार केले आहेत. तसेच संयुक्त समाजवादी पक्ष व उजवा कम्युनिस्ट पक्ष यांचीही काही राज्यांत निवडणुकीसाठी सोयरिक जमली आहे. ज्या राज्यांत संयुक्त समाजवादी पक्ष बलवान नाही तेथे मात्र त्याने जनसंघाशी हातमिळवणी करण्याचे ठरविले आहे. आंध्रमध्ये तर डावे कम्युनिस्ट व स्वतंत्र यांचा करार होण्याच्या दृष्टीने वाटाघाटी चालू आहे. हे सर्वच चित्र आज तरी बरेचसे अस्पष्ट आहे. कारण बऱ्याच ठिकाणी परस्परविरोधी शक्ती एकत्र येत आहेत. परंतु असल्या विचित्र शय्यासोबती फार काळ टिकणार नाहीत. कदाचित ही निवडणूक अशा तऱ्हेने लढविली जाईलही. परंतु ही निवडणूक पार पडल्यानंतर मात्र एका बाजूस डावे आणि दुसऱ्या बाजूला उजवे असे दोन स्पष्ट गट दिसल्याशिवाय राहणार नाहीत.

राजनीतीची ही वळणे इंदिरा गांधी व कामराज जागरूकतेने न्याहाळीत अस-तील यात नवल नाही. येत्या निवडणुकीत तरी डावा काय किंवा उजवा काय, कोणताच गट स्वत:च्या हाती राज्यकारभाराची सूत्रे घेण्याइतके घवघवीत बहुमत मिळवू शकणार नाही, असा त्यांचा कयास आहे व म्हणून दोन्ही गट Least unacceptable candidate म्हणून इंदिरा गांधींकडेच प्रधानमंत्रिपद ठेवण्यास

राजी होतील, असे दिसते. दोन्ही गटांच्या दुर्बलतेवरच या मध्यममार्गी गटाचे भवितव्य अवलंबून असल्यामुळे अशा परिस्थितीत या अल्पसंख्याक मध्यममार्गी गटांत फूट पडता कामा नये याची जाणीव इंदिरा गांधी व कामराज या दोघांनाही झाली आहे. दक्षिणेकडच्या राज्यांचे सूत्रधारपद कामराजांनी सांभाळावे व त्यांनी इंदिरा गांधींचे नेतृत्व मान्य करून दाक्षिणात्यांचे वर्चस्व कायम राहील, याची खबरदारी घ्यावी, असा हा एकंदर बनाव दिसतो. आणि म्हणूनच मेहेरचंद खन्ना व शामनाथ या मंत्र्यांना तिकिटे देण्याचे दिल्ली प्रदेश काँग्रेसने नाकारले होते. त्यांना तिकिटे दिलीच पाहिजेत, असा आग्रह इंदिरा गांधी यांनी ज्या वेळी व्यक्त केला तेव्हा कामराजांनीही इंदिरा गांधी यांना विरोध केला होता. परंतु आता मात्र या दोघांनाही तिकिटे दिली पाहिजेत, असे आपले मत असल्याचे त्यांनी जाहीर केले. मध्यंतरी मध्यममार्गी गटात जी फूट पडली होती ती सांधण्यासाठी कामराजांनी पावले टाकावयास प्रारंभ केला आहे. इंदिरा गांधी आणि कामराज यांच्यामधील मतभेदांचे चित्र यापुढे दिसणार नाही ते यामुळेच.

— सदाशिव पेठकर



# मुक्ताफळे



## ☐ हट्टी हमीद आणि कु-रुंदकर !

श्री. हमीद दलवाई हे मराठीतील एक ख्यात-इनाम मराठी लेखक आहेत. त्यांच्या 'इंधन' या कादंबरीला महाराष्ट्र शासनाने मोठे इनाम देऊन त्यांचा गौरव केला आहे. या इनामाने ते ख्यातनाम झाले आहेत. या गृहस्थाने चांगल्या कथा-कादंबऱ्या लिहिल्या, तर महाराष्ट्र शासनाकडून आणखी पुष्कळ बक्षिसे त्यांना मिळू शकतील... परन्तु याकरता त्यांनी महत्त्वाचे पथ्य हे पाळायला हवे, की काँग्रेस सरकारच्या वा काँग्रेस पक्षाच्या ध्येयधोरणाविरुद्ध त्यांनी मार्च ६७ पर्यंत तरी काही लिहू-बोलू नये. मराठीतील थोर थोर प्रतिभेची माणसे जे वर्षानुवर्षे करू शकतात, ते या गृहस्थाला त्याने मनात आणले तर दोन-तीन महिने करणे सहज जमेल. निवडणुकीत भरघोस मते पडून काँग्रेस सरकार निवडून आले तर पुढची इनामे आहेत ! ही साधी गोष्ट हमीदरावांच्या लक्षात येऊ नये ? यावर दलवाईंचे असे म्हणणे असेल, की बक्षीस काँग्रेस शासनाने दिले तरी पुस्तक मराठीतील चिकित्सक टीकाकारांनी निवडले ! हा त्यांचा भ्रम आहे. नाटकांच्या स्पर्धांचे परीक्षक प्रेक्षकांत बसतात म्हणून त्यांची नावे लपवता येत नाहीत. शासन परीक्षक नेमते व हे कोण असतात, ते सरकार गुप्त ठेवते ! म्हणजे ज्यांना बक्षिसे मिळतात त्यांना व प्रकाशकांना ते माहीत असते. परंतु 'मतदारांना' माहीत नसते. परीक्षकांना शासनाला काय आवडेल याचा विचार करावा लागतो. तेव्हा हमीदरावांनी भलत्या भ्रमात राहू नये. त्यांना इशारा देण्याचे आज एक कारण घडले ते म्हणजे, 'साधना' साप्ताहिकात त्यांनी नुकताच प्रसिद्ध केलेला लेख. या साप्ताहिकाच्या १७-१२-६६ च्या अंकात कुणी नरहर कुरुंदकर नावाच्या प्राध्यापकाने, दिल्ली येथील सांप्रदायिकताविरोधी कमिटीला पाठविलेले निवेदन प्रसिद्ध झाले आहे. निवेदन फार भयंकर 'सांप्रदायिकता'विरोधी आहे.] या निवेदनात हे महाशय काय भयंकर लिहितात पाहा –

" सर्व जगातले सर्व धर्म उदात्त, पवित्र आणि मंगल आहेत. या धर्मांचा आपापसात एकमेकांशी विरोध नाही. प्रत्येकजण आपापल्या धर्मावर प्रामाणिक व परिपूर्ण श्रद्धा ठेवून इहलोकप्रधान लोकशाहीचा पुरस्कर्ता होऊ शकतो, ही भूमिका आजवर आमचे वंदनीय नेते मांडीत आले आहेत. जोपर्यन्त ही भूमिका आपण त्याज्य समजत नाही तोपर्यन्त सांप्रदायिकतेच्या विरुद्ध लढा देणे या गोष्टीला काही अर्थ नाही.

" जर सर्वच धर्म चांगले असतील तर मग धर्मपुरस्कृत जातिव्यवस्थेवर व धर्म-मान्य स्मृतींच्या कायद्यांवर आक्षेप घेण्यात अर्थ नाही."

" हिन्दुसमाज विस्कळीत असल्यामुळे व हिन्दुस्थानाबाहेर हिन्दूंची लोकसंख्या कुठेच फार मोठी नसल्याने, हिन्दूंच्या जातीयवादाला राष्ट्रद्रोही असे स्वरूप नाही. या जातीयवादाला आक्रमक स्वरूपही नाही. सांप्रदायिकताविरोधी कार्यक्रमात तातडीचा प्रश्न आक्रमक व राष्ट्रहितविरोधी असलेल्या मुस्लिम जातीयवादाचा आहे."

" एक दूरगामी कार्यक्रम म्हणून हिन्दू-जातीयवादाविरुद्धचा कार्यक्रम मी समजू शकतो, पण नजीकचा कार्यक्रम म्हणून मुस्लिम जातीयवाद्यांच्याविरुद्धचा लढा आपण समजून घेतला पाहिजे–"

पाहिलंत हा प्राध्यापक किती भयंकर निवेदन करतो आहे ! एवढेच सांगून हा कु-रुंदकर थांबत नाही, तर यापुढे जाऊन तो धोकेबाज सत्ये सांगून टाकतो. तो लिहितो–

" हिन्दूंच्या समाजात धर्माची ऐतिहासिक चिकित्सा आणि धर्माची बौद्धिक चिरफाड करण्याची प्रक्रिया प्रचंड वेगाने चाललेली आहे. त्यामुळे हिन्दूंच्या प्रत्येक चालीरीतीवर, प्रत्येक धर्ममतावर व प्रत्येक धर्मग्रंथावर हिन्दू धर्मातूनच चिकित्सेचे कठोर प्रहार होत आहेत. यापेक्षा मुस्लिम समाजाची रचना निराळी आहे. धर्म-नेत्यांना दुखवण्याची ताकद सुशिक्षित मुस्लिम तरुणांतही नाही. **आणि तो काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वातही नाही.** (जाड ठसा आमचा) आणि मुस्लिम समाजात धर्माच्या चिकित्सक अभ्यासाचा घोर अभाव आहे. गोपींबरोबर रासक्रीडा करणारा कृष्ण आणि पत्नीला सोडून देणारा राम हा हिन्दूंच्या टीकेचा विषय होऊ शकतो. पण हजरत खदिजा हजरत पैगंबरांपेक्षा पंधरा वर्षांनी वडील होती आणि प्रेषिताची लाडकी पत्नी आयशा प्रेषितापेक्षा तीस वर्षांहून अधिक लहान होती. हजरत पैगंबर वारले, तेव्हा त्यांचे वय साठीच्या आसपास होते आणि आयशा सतरा-अठरा वर्षांची होती. यावर टीका करणारा मुसलमान अजून जन्माला यायचा आहे. पवित्र कुराण हे परमेश्वरीय पुस्तक नसून मानवी पुस्तक आहे आणि सर्व मानवी ग्रंथांप्रमाणे तेही अपूर्ण आहे, हेही एकदा स्वतःच्या अभ्यासूपणाचा गर्व वाहणाऱ्या कुणी मुस्लिम पंडितांनी म्हणण्याचे धाडस केले नाही. तरवारीच्या जोरावर धर्मपरिवर्तन करण्याची आज्ञा सातव्या शतकातली आहे. विसाव्या शतकात ही मात्रा निरुपयोगी

आहे म्हणून रद्द समजावी हे म्हणणाऱ्यांचे मुस्लीम समाजात खून होतात! इस्लामचा व्यापक, विपुल प्रमाणात व प्रखर-चिकित्सक अभ्यास करण्याची चळवळ जर मुसलमानात सुरू झाली तर हिन्दू-मुस्लिम समाजातील चिकित्सक अभ्यासाच्या या प्रक्रिया या देशात सांप्रदायिकताविरोधी भव्य आंदोलन करू शकतील."

हिन्दू समाज व मुसलमानी समाजातील फरक वाटोळे वाटोळे बोलून कमी करण्याचा राष्ट्रव्यापी कार्यक्रम काँग्रेसने हाती घेतलेला असताना, अशा तऱ्हेचा स्फोटक लेख ऐन निवडणुकीच्या दारात प्रसिद्ध करण्याचा वेडेपणा कुणी केला, तरी हमीद दलवाईंनी हुरळून जाणे मुळीच आवश्यक नव्हते. या भयंकर प्राध्यापकांना अभिप्रेत असलेली चिकित्सक अभ्यासाची चळवळ करण्याचा प्रयत्न दलवाई यांनी नुकताच केलेला होता. मुसलमान स्त्रियांनाही बहुपत्नित्वाचा कायदा नको आहे, हे सरकारला सांगण्यासाठी त्यांनी मोर्चा काढला! यात एकूण सात मुस्लिम स्त्रिया होत्या! अवघ्या महाराष्ट्रात फक्त सात मुस्लीम स्त्रियांनी यासाठी पुढे यावे यावरून दलवाईंनी शहाणे होऊन वस्तुतः हा नाद सोडून द्यायला हवा. परन्तु या प्राध्यापकांचे छापील निवेदन प्रसिद्ध होताच दलवाईंना पुन्हा सुरसुरी आलेली दिसते. त्यांनी याच साप्ताहिकात एक लेख लिहून जाहीर केले आहे की, या सात मुस्लिम स्त्रियांचे नेतृत्व करणाऱ्या मुसलमान स्त्री आमदार कमर अहमद यांना काँग्रेसने निवडणुकीत तिकिट नाकारले आहे!

आता ज्या इसमाला आपल्या चळवळीच्या पराभवाची चिकित्सा करता येत नाही त्याने काँग्रेस पक्षाची चिकित्सा करावी हे काय धाष्टर्य होय! श्रीमती कमर अहमद यांच्या मते मुसलमानांनाही एकपत्नित्वाचा कायदा लागू व्हावा! या मताच्या बायका एकंदर किती तर सात! आता या बाईंना तिकिट देऊन काँग्रेसला काय त्यांचे डिपॉझिट जप्त करायचे आहे? काँग्रेसला निवडून येणारे उमेदवार पाहिजेत. सांप्रदायिकता निस्तरायला निवडून आल्यावर कमिशन वगैरे नेमू! नको त्या विषयात साहित्यिकांनी बोलू नये!

बरं हा 'रोग' काय फक्त काँग्रेसलाच झालाय? श्री दलवाईंचे मुसलमानां विषयीचे चिकित्सक लेखन प्रसिद्ध करणाऱ्या 'मराठा' पत्राचे संपादक आचार्य अत्र हे संपूर्ण महाराष्ट्र समितीचे पितामह! एस. एम. कुलपती! पण संपूर्ण महाराष्ट्र समितीने तरी असे सांगितले का, की मुंबईच्या मुसलमान मतदारसंघात आम्ही श्रीमती कमर अहमदना पाचारण करतो! त्यांनी मुळी दोन्ही जागाच मुस्लिम लीगला देऊन टाकल्या! कारण त्यांनादेखील निवडून येणारे उमेदवार हवे आहेत! दलवाई, परस्पर हलवायाच्या घरावर तुळशीपत्र का ठवता? तेव्हा श्री. हमीद दलवाई यांनी यावरून काय तो धडा घ्यावा. चौफेर बंदिस्त मुस्लिम समाजातील शिकलेला, परंतु हजरत पैगंबरांच्या आज्ञा पाळणाऱ्या मुसलमान तरुणांशी लग्न करून परतावलेल्या सुशिक्षित इतर धर्मीय तरुण स्त्रियांच्या जीवनावर श्री. दलवाई

यांनी वाटल्यास एक कादंबरी लिहावी. त्यांच्या किंकाळचाही गुदमरवण्यात आलेल्या आहेत. कादंबरीला चांगला विषय आहे. मात्र कादंबरीला बक्षीस मिळाल्यास विषय सुचवल्याचे निम्मे इनाम त्यांनी आठवणीने ग्यानबाला द्यावे !

## □ सगोत्र बरवे !

शिवाजी पार्कच्या नर्सिंग होममध्ये अखेर मेनन बाळंत झाले ! " समाजवाद, अलिप्ततावाद आणि शांततेचे धोरण " यांना वाचवण्यासाठी त्यांना मुंबईच्या ईशान्य मतदारसंघातूनच लोकसभेत निवडून येणे अवश्य होते..... हे काँग्रेसने त्यांना करू दिले नाही म्हणून त्यांनी काँग्रेस सोडली. समजा, मेनन हे श्री. डांगे यांचेविरुद्ध उभे राहून मुंबईतून निवडून आले असते तर " समाजवाद, अलिप्तता-वाद आणि शांततेचे धोरण " काही वाचत नव्हते ! केरळमधून आले असते तरी वाचत नव्हते. कारण, दिल्लीच्या लोकसभेतील ५३० खुर्च्या लक्षपूर्वक तुम्ही पाहिल्या असत्यात, तर एका खुर्चीवर " ही खुर्ची मुंबई ईशान्य मतदार संघातून निवडून येणाऱ्या खासदारासाठी असून येथून निवडून आलेल्या उमेदवाराला " समाजवाद, अलिप्ततावाद व शांततेचे धोरण " यांचा पुरस्कार करण्याची बुद्धी परमेश्वर देतो, " असे लिहिलेले आढळेल. या मतदारसंघात ' ठाणे ' हे शहर असल्यामुळे या मतदारसंघाचा मेनन यांना मोह पडला असावा. लोकसभेत ' ठाण्याचा खासदार ' म्हणून मिरवता यावे यासाठी श्री. मेनन यांनी पुन्हा चंग बांधला आहे. वेड्यांनी खुशाल मत द्यावे. कुशाग्र असले तरी मेनन यांनी आता गोत्र बदलले आहे. बर्वे ' सगोत्र ' आहेत आणि शिवाय बरवे आहेत !

## □ भस्मीभूतस्य पक्षस्य

निराद चौधरी नावाचे एक बंगाली गृहस्थ इंग्रजी लेख लिहून भारतीय सर-कारची वारंवार बदनामी करीत असतात. यांना पाश्चात्य वर्तुळात विचारवंत समजतात. नुकताच एका बंगाली नियतकालिकात त्यांनी इंग्रजी लेख लिहिला आहे. त्यात भारताला जे अनेक देश धान्य मदत देतात त्यांचा विपर्यास करून त्यांनी भारताला " हातात कटोरे घेऊन फिरणारी भिकारीण " म्हटले आहे. हे एक वेळ चालेल. कारण, हा ज्याच्या त्याच्या दृष्टिकोनाचा प्रश्न आहे. परंतु या अलीकडील लेखात ते पुढे लिहितात—

" I strongly hold that no sincere approach to the food problem can come without either a deep suffering from the shortage of food or of a deep sense of guilt about it and the ruliing class feel neither. "

यांचे म्हणणं असे की, ‹अन्नाच्या तुटवड्याने होणारे विपुल दु:ख भोगल्याशिवाय किंवा यावद्दलची आपली नालायकी ओळखून पश्चात्तापदग्ध झाल्याशिवाय अन्नप्रश्न सुटण्याचा प्रामाणिक प्रयत्नच होऊ शकत नाही. आजच्या राजकर्त्यांजवळ या दोहोंचा अभाव आहे. चांगलं आहे.... म्हणजे अन्नप्रश्न सोडवायचा का तर दु:ख नको म्हणून आणि तो सोडवता यावा म्हणून दु:खच हवे! आणि पश्चात्तापाने दग्ध कशाला व्हायला हवे? विचारवंत म्हटला की त्याला असले हृदयशून्य विचार मांडलेच पाहिजेत का? कसे तरी जगणे महत्त्वाचे आहे. स्वाभिमान वगैरे सगळ्या कल्पनेच्या गोष्टी आहेत. भूक खरी आहे आणि अन्न खरे आहे. अमेरिकन व ऑस्ट्रेलियन गव्हाने भूक भागत नाही, असे थोडेच आहे? फार पुढचा विचार करण्यात अर्थ नाही–

यावत् जीवेत् सुखं जीवेत् ,
ऋणं कृत्वा घृतं पिबेत् ।
भस्मीभूतस्य पक्षस्य,
पुनरागमनं कुत: ।।

सत्तेवर असेपर्यंत सुखाने राज्य करावे. कर्ज करून तूप खावे. एकदा सत्ता सरकली की पुन्हा कसचे खुर्चीवर येणे होते आहे?

— ग्यानबा

## अडचण !

गोविंदरावांचे नुकतेच लग्न ठरले होते. लग्नाची तारीख जवळ येऊन ठेपली तरी त्यांना राहण्यास अजून जागा मिळालेली नव्हती, त्यामुळं ते काळजीत होते. . . . . . . . . . . . . . .

"अरे, तुला जागा मिळाली नाही म्हणून इतकी काळजी का करतोस!" त्याचा मित्र म्हणाला. "तू मग आपल्या सासऱ्याकडेच जाऊन राहा."

"छेऽऽ, ते जमावयाचे नाही" गोविंदराव विशादपूर्ण स्वरात म्हणाले, "कारण अजून तेच आपल्या सासुरवाडी राहत आहेत."

— रमेश के. सहस्रबुद्धे

# निवडणूक १९६७

## उजव्यांना दिवस बरे आहेत

[ दाढी वाढलेली, गाल बसलेले, केस पिंजारलेले, मळके चुरगळलेले कपडे अंगावर असा तिशीच्या सुमाराचा, आधी कॉंग्रेस आणि नंतर सोशॅलिस्ट, कम्युनिस्ट, डावा कम्युनिस्ट असा राजकीय प्रवास केलेला आणि आता नुसताच निष्ठाहीन सैनिक असलेला, भरपूर शिक्षण झालेला एक भाई एका सामान्य हॉटेलात पाव पातळ भाजी खात आहे. विमा एजंटाचा बेताचा धंदा. त्याला बघताच (माणूस प्रतिनिधी) चौकशी करण्यासाठी आत शिरतो.— ]

मी : काय म्हणतो भाई तुमचा धंदा ?

भाई : एकदम एक्सलंट. दिसत नाही तुला. भारताची यशस्वी आर्थिक प्रगती आणि आमची वाटचाल यांच्यात एकदम साम्य. पण तू बोल. बऱ्याच दिवसांनी भेटतोस.

मी : तुझं एकूणच धंद्याकडे आणि प्रकृतीकडे दुर्लक्ष दिसतंय.

भाई : अरे सोड, या गोष्टी आता. निवडणुका जवळ आल्यात म्हणून मी फार बिझी असतो. सारखा हिंडत असतो.

मी : निवडणुका ? अजून तुझी हौस गेली नाही ? अरे, जरा बायका-मुलांकडे बघ.—

मा. : (तुसडेपणाने) तू शिकवू नकोस या गोष्टी मला. सर्व व्यवस्थित आहे. पाच वर्षांनी ही पर्वणी येते देशात. सारा देश तळापासून ढवळून निघतो. वुई मस्ट बी कॉन्शस. आणि तुलाही सांगतो, इंटरेस्ट नसेल तर घे.

मी : अच्छा ? पण मला इंटरेस्ट नाही असं कुणी सांगितलं ? आय ॲम टेरिबली इंटरेस्टेड. काय म्हणतात तुमचे लेफ्टिस्ट ? देशात डाव्यांना आता बरे दिवस येतायत असं दिसतंय. येत्या इलेक्शनमध्ये चांगले चान्सेस दिसतायत.—

भाई : एकदम चूक, अगदी चुकीचं निरीक्षण आणि चुकीचा अंदाज. मी सांगतो हिंदुस्तानातल्या आणि जगातल्या साऱ्याच डाव्या फोर्सेसना एक प्रकारचं डिमॉरलायझेशन आलं आहे. उदासीनता पसरली आहे, हे तुझ्या लक्षात यायला हवं होतं. विशेषतः आपल्या देशात तर ही उदासीनता फार जाणवते.

मी : अरेच्चा ! हे काय भलतंच ? मी समजत होतो देशात दंगेधोपे, जाळपोळी वाढताहेत. तेव्हा डाव्यांना जरा बरे दिवस आलेले दिसताहेत.—

भाई : अं ऽऽहं. खरं म्हणजे डाव्या शक्तींना अशा परिस्थितीचा चांगला

उपयोग व्हावा. पण परिस्थितीचा उपयोग करण्याइतपत डोकं हवं, संघटना हवी आणि काहीतरी नेमकी दिशा ठरलेली असावी.

मी : म्हणजे आपल्या देशाच्या डाव्या राजकारणात यांपैकी काहीच नाही असं म्हणतोस ?

भाई : एकदम बरोबर. एकतर साऱ्या डाव्या पक्षांतच आपल्या दिशेविषयी संभ्रम माजला आहे. कम्युनिस्टांमधला गोंधळ तर सुप्रसिद्धच आहे. आणि एकाही डाव्या पक्षात जनतेची नाडी अचूक हेरून त्याप्रमाणे चालणारा प्रज्ञावंत नेता नाही. कुठल्यातरी इंपोर्टेड तत्त्वज्ञानावर आंधळेपणाने विश्वास ठेवून ते इकडे खपविण्याचा त्यांचा अट्टाहास आहे. देशाच्या परिस्थितीला अनुरूप असं त्या त्या तत्त्वज्ञानाचं विवेचन करण्याचं, त्यात बदल करण्याचं, भर घालण्याचं आणि ते लोकांना पटेल अशा भाषेत एक्स्प्रेस करण्याचं सामर्थ्य आणि आवाका एकातही नाही.

मी : आणि याचा परिणाम

भाई : काय असणार ? उजव्यांची चंगळ. मी सांगतो, आपल्या देशात डाव्या पक्षांचा जोर कितीही वाटत असला तरी खरी प्रगती उजवे पक्ष करताहेत. चुकीच्या असोत वा बरोबर, पण निश्चित दिशा ते ठरवून आहेत. खरा जोष, खरा उत्साह आणि आत्मविश्वास आपल्याला उजव्याच पक्षांमध्ये दिसतो. आणि डावे पक्ष सारे विफल आणि चिडखोर बनलेले वाटताहेत. आणि यांमध्येच उजव्यांनी पहिली लढाई जिंकली आहे.

मी : हॅं: मुळीच पटत नाही.

भाई : ( मूठ आपटून ) का पटत नाही ? अरण्यातून जाणाऱ्या लहान मुलासारखी जनतेची अवस्था असते. ज्याच्याजवळ आत्मविश्वास आहे, जो बलिष्ठ आहे आणि भविष्याची त्याला निश्चित खात्री आहे अशा पक्षाजवळच जनता जाणार. आणि हे स्वाभाविकच आहे. एखाद्या तत्त्वासाठी जीव टाकणारे फारच थोडे लोक असतात. सर्वांची साधारण प्रवृत्ती आपण आणि आपलं घर सांभाळून मग इतरांकडे पाहण्याची असते. वर्षभरात स्वराज्य मिळवून देतो असं आत्मविश्वासानं सांगून एक निश्चित कार्यक्रम देणाऱ्या गांधींमागे नाही कोटचवधी लोक गेले ? तसे सावरकरांमागे का नाही गेले ?

मी : पण उजव्या पक्षांत एवढा आत्मविश्वास आहे ?

भाई : निश्चितच आहे. जनसंघाएवढा यशाचा आत्मविश्वास कोठल्या विरोधी पक्षात आहे ? आज नाही उद्या आपण या देशावर राज्य करणारच ही त्यांची खात्री आहे. आणि त्यासाठी त्यांची धीमी तयारीही चालू आहे. असाच पक्ष सामान्य माणसाला सोयीचा वाटणार. स्वतंत्रांचीही तीच स्थिती.

मी : पण नुसत्याच पोकळ आत्मविश्वासाचा काय फायदा ?

भाई बरोबर आहे. पण आपल्या देशातल्या उजव्यांचा आत्मविश्वास हा पोकळ नाही. जनसंघ हळूहळू का होईना लोकांची नाडी पकडण्यासाठी

प्रयत्न करीत आहे, त्यासाठी आपल्या ध्येयधोरणांमध्ये अधूनमधून समाजवादाचे मसाले पेरून डाव्यांमधली थोडीशी हवा काढून घेण्याचा बेरकी चाणाक्षपणा करीत आहे. आणि संघटनेच्या बाबतीत तर कम्युनिस्ट आदर्शांना टिकणारा जनसंघ हाच एकमेव पक्ष भारतात आहे. खुद्द कम्युनिस्टांजवळही एवढी संघटना नाही. तेव्हा जनसंघाचा आत्मविश्वास फुकट नाही. हां, पण एक शक्यता आहे. एखाद्याजवळ खूप आत्मविश्वास असला की माणूस थोडा 'गलथान' राहून चुका करू शकतो. जनसंघाचं काही अजून तसं लक्षण दिसत नाही.

मी : म्हणजे एकूण उजवे डाव्यांवर मात करण्याच्या बेतात आहेत; असं म्हणायचं—

भाई : नॉट एक्झॅक्टली. चीतपट होण्याचा शेवटचा क्षण अद्याप आला नाही. त्याला खूप अवधी आहे. पण दरम्यान सध्या उजवे पक्ष जरा चांगल्या परिस्थितीत आहेत एवढेच. याचा त्यांनी योग्य उपयोग मात्र करून घेतला पाहिजे.

मी : मग येत्या निवडणुकीत त्याचं काही प्रतिबिंब पडेल ?

भाई : अगदी बारकाईने पाहिलं तर निश्चितच दिसेल. गेल्या पाच वर्षांच्या तुलनेने उजव्यांची ताकद या निवडणुकीत वाढलेली दिसेल. आणि डाव्यांच्या ताकदवाढीच्या प्रमाणापेक्षा उजव्यांचं हे प्रमाण अधिक असेल—

मी : हा आपला अंदाज—

भाई : (चिडून) अर्थातच पण त्याला काही बेस आहे. तूही बघशील. आणि उजव्यांची वाढती ताकद मूमेंटम घेऊ लागली की तूही इतर सर्व लोकांप्रमाणे त्यांच्या कँपात येऊन बसशील.

(मी हसू लागतो. भाई अधिकच चिडून बोलू लागतो. आणि भाई एवढ्या सगळ्या प्रवासानंतर स्वतंत्रांत किंवा जनसंघात गेला तर काय मजा येईल या नुसत्या कल्पनेनेच माझे हसू वाढू लागते......)

मध्य प्रदेश

# विरोधकांच्या संयुक्त मंत्रिमंडळाची शक्यता

क्षेत्रफळाच्या दृष्टीने मध्यप्रदेश हे भारतातील सर्वांत मोठे राज्य. सुमारे साडेचार लाख चौरस किलोमीटर क्षेत्रफळाच्या या राज्यात विविध जाती–जमातींचे आणि विविध भाषा बोलणारे सुमारे साडे तीन कोटी लोक राहतात. भाषावार प्रांतरचनेपूर्वीच्या मध्य प्रांतातून काही तुकडे तोडून, आजूबाजूच्या हिंदी भाषिक प्रदेशांतील काही तुकडे जोडून हा नवा प्रचंड मध्यप्रदेश करण्यात आला. त्यामुळे महाराष्ट्र, गुजरात आणि इतर एकभाषी राज्यांप्रमाणे मध्यप्रदेशाला स्वतंत्र

व्यक्तिमत्त्वच नाही. ग्वाल्हेर, इंदोर आदी राज्यांच्या उत्तर भागांत माजी संस्थानिकांची पकड जबरदस्त आहे, तर राज्याच्या दक्षिण भागात बस्तर, छत्तीसगड-सारख्या ठिकाणी आदिवासी जमातींचे प्रावल्य आहे.

या बिनचेहऱ्याच्या व्यक्तित्वामुळेच राज्यातील काँग्रेसचे भवितव्य अनिश्चित आहे. आणि माजी संस्थानिकांची काँग्रेसवरील नाराजी. गेल्या वर्षीचे बस्तर आदिवासी भागातील राजा भंजदेव प्रकरण, विद्यार्थ्यांच्या दंगली आणि जनकाँग्रेसची स्थापना यामुळे मध्यप्रदेशातील काँग्रेस सरकारचे अस्तित्व निश्चितच धोक्यात आले आहे.

काँग्रेस सरकारला आव्हान देणारा मध्यप्रदेशातील सर्वांत मोठा पक्ष म्हणजे जनसंघ. सध्याच्या २८८ जागांच्या विधानसभेत जनसंघाने ४८ जागा मिळविल्या होत्या. गेल्या पाच वर्षांच्या काळात जनसंघाने मध्यप्रदेशात खूप मेहनतीने काम केले आहे. बलराज मधोकांसारखे काही पुढारी मध्यप्रदेशात आम्ही सत्ता काबीज करूच, असे जरी म्हणत असले तरी जनसंघाला सुमारे शंभर जागा मिळतील असे जनसंघातलेच पुढारी कबूल करतात.

## ग्वाल्हेरचे राजघराणे

ग्वाल्हेरच्या राजघराण्याचे मध्यप्रदेशाच्या राजकारणात मोठे स्थान आहे. काँग्रेसने या राजघराण्याचा पाठिंबा मिळविण्याचा खूप प्रयत्न केला. पण तो फुकट गेला. उलट जनसंघाला ग्वाल्हेरच्या राजघराण्याचा पाठिंबा मिळविण्यात यश आले आहे. संयुक्त समाजवादी पक्षानेही जनसंघाशी निवडणूक-करार केला आहे. या सर्व घटनांमुळे जनसंघाला आता येत्या सार्वत्रिक निवडणुकीबद्दल खूपच आत्मविश्वास वाटू लागला आहे. या निवडणुकीत जरी नाही तरी १९७२ मध्ये आपण मध्यप्रदेशात राज्यावर येऊ, अशी जनसंघाची खात्री आहे. आणि विद्यार्थ्यांमध्ये व शेतकऱ्यांमध्ये जनसंघाची ताकद वाढते आहे.


फ्री — मोफत — फ्री

मुंबई वरळी मटका डेली चार्ट

दररोज बरोबर आजच लिहा

महालक्ष्मी फोरकास्टिंग सर्व्हिस

ब्रांच पोस्ट ऑफिस गुण्डिआली

सब-पोस्ट—मांडवी, जिल्हा कच्छ, गुजराथ राज्य

मध्य प्रदेशाचे मुख्य मंत्री श्री. डी. पी. मिश्रा यांना मात्र जनसंघाचे हे आव्हान म्हणजे बालिशपणा वाटतो. त्यांच्या हिशेबाप्रमाणे काँग्रेस सत्तेवर तर येईलच पण त्याचबरोबर सध्याची विधानसभेतील काँग्रेस उमेदवारांची संख्या १७५ वरून २२५ पर्यंत जाऊ शकेल.

पण श्री. मिश्रा यांनी हा हिशेब केला तेव्हा जनकाँग्रेसची स्थापना व्हायची होती. सान्याच राज्यांप्रमाणे मध्यप्रदेश काँग्रेसमध्येही अटीतटीच्या सत्तास्पर्धा आहेतच. श्री. मिश्रा यांची मध्य प्रदेशातील मुख्यमंत्रिपदाची कारकीर्द संपत आली आहे, असे बरेच काँग्रेसजन मानतात. श्री. मिश्रा दिल्लीला गेल्यानंतर काँग्रेसची धुरा कोण सांभाळणार यावर मध्य प्रदेश काँग्रेसमध्ये भांडणे चालू आहेतच. त्याचबरोबर त्यांना पाण्यात पाहणारेही काँग्रेसी गट आहेत. गेल्या महिन्यात जनकाँग्रेस स्थापन होताच काँग्रेसचा हा मोठा असंतुष्ट गट पक्ष सोडून गेला. याचा येत्या निवडणुकीत काँग्रेसवर चांगलाच परिणाम होणार आहे.

मध्य प्रदेशात आणखी थोडाफार जोर असलेला विरोधी पक्ष म्हणजे संयुक्त समाजवादी पक्ष. विंध्य प्रदेश या विभागात या पक्षाचा चांगला जोर आहे. या निवडणुकीत जनसंघाशी करार केल्याने सं. सो. पा. लाही बऱ्याच आशा आहेत.

१९६२ साली काँग्रेसला एकूण मतांच्या फक्त ३८ टक्के मते पडली होती. मग विरोधी मते फुटली असल्याने काँग्रेसचा भरघोस विजय झाला होता. या वेळी या उरलेल्या ६२ टक्के विरोधी मतांतील बरीचशी मते संघटित झाली आहेत. त्यामुळे मध्य प्रदेश काँग्रेसला फार मोठा धोका निर्माण झाला आहे. सं. सो. पा., जनकाँग्रेस आणि जनसंघ यांनी हुशारी दाखविली तर ते एकत्र येऊन मध्य प्रदेशात विरोधी पक्षांचे संयुक्त मंत्रिमंडळ स्थापू शकतील.

काँग्रेसच्या पराभवाची आणि विरोधी मंत्रिमंडळाच्या स्थापनेची एवढी दाट शक्यता केरळनंतर मध्य प्रदेशातच आहे. ●


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

• समीर

# विचार वारे

## ☐ अमेरिकन विद्यार्थ्यांची शिस्तबद्ध निदर्शने

निदर्शने करणारा विद्यार्थी-वर्ग फक्त भारतातच वाढत आहे का ? नाही. उलट गेल्या काही वर्षांत अमेरिकेत विद्यार्थ्यांची निषेध-निदर्शने खूपच वाढली आहेत. परंतु युरोपियन व आशियाई देशांतील विद्यार्थ्यांच्या निदर्शनांच्या मानाने ही निदर्शने खूपच शांतिपूर्ण असतात, अशी माहिती अमेरिकेतील कॅलिफोर्निया विश्वविद्यालयाचे समाजशास्त्राचे प्राध्यापक डॉ. नाथान ग्लेझर यांनी थोड्या दिवसांपूर्वीच्या भारतभेटीत दिल्लीला बोलताना दिली. या विषयावर नुकत्याच दिलेल्या आपल्या भाषणात त्यांनी अमेरिकेतील विद्यार्थी-निदर्शनांतून जे तात्पर्य काढले ते हिंदुस्थानातील विद्यार्थी-वर्गाला व सरकारलाही बरेच मार्गदर्शक होऊ शकेल.

सर्वसाधारणपणे अमेरिकन विद्यार्थी निदर्शन करताना हिंसक वर्तन करीत नाहीत किंवा विश्वविद्यालयाच्या चालकांना डांबूनही ठेवीत नाहीत. पण विद्यार्थी शिस्त सांभाळून वागल्याने पोलिसही तसेच वागतात. विद्यार्थ्यांना इजा न करता त्यांचे निदर्शन कसे आटोक्यात ठेवावे, याचे पोलिसांना खास शिक्षण देण्यात येते. या परस्पर-सौजन्यामुळे खूपच फायदा होतो. उदाहरणार्थ, बर्कले येथे झालेल्या एका विद्यार्थी-निदर्शनात कधी नाही ती एका मोटारीची नासधूस झाली, तेव्हा विद्यार्थ्यांनी वर्गणी गोळा करून मोटार-मालकाचे नुकसान भरून दिले.

अमेरिकन विद्यार्थ्यांचे लक्ष ज्या प्रमुख समस्यांनी वेधले आहे त्या म्हणजे निग्रोंचे सामाजिक हक्क, दारिद्र्य आणि व्हिएटनाम युद्ध. या प्रश्नांच्या बाबतीत अमेरिकन सरकारचे धोरण तेथल्या विद्यार्थ्यांना पटत नाही, त्यामुळे त्यांच्यात असंतोष पसरला आहे. येथे एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे, व ती म्हणजे व्हिएटनाम सोडून इतर कुठल्याही समस्येचा विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संबंध येत नाही. विद्यार्थी-वर्गात निग्रोंची संख्या कमी आहे व इतर देशांच्या मानाने अमेरिकन विद्यार्थी गरीब नसतात.

अमेरिकन विद्यार्थी या विषयांवर चळवळ करीत असले तरी अमेरिकन राजकारणात मात्र त्यांना फारच किरकोळ स्थान आहे. सरकारी धोरण हे शासनकर्ते, मोठमोठे उद्योगपती व लष्करी नेते या मंडळींच्या हातून घडविले जात असते. अमेरिकन जनतेचा साम्यवादाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलत आहे; पण अमेरिकन विद्यार्थ्यांनी व्हिएटनाम युद्धाचा निषेध केल्याने हा बदल होत आहे असे

मात्र नाही. मुळात साम्यवादाचीच आता शकले पडू लागली असल्याने हा बदल घडून येत आहे.

## □ भौतिक व सामाजिक शास्त्रांची एकात्मता

सात रशियन शास्त्रज्ञांचे एक शिष्टमंडळ थोड्या दिवसांपूर्वी भारतात आले होते, तेव्हा भारतीय शास्त्रज्ञांनी त्यांचा दिल्लीला सत्कार केला. त्या वेळी मंडळाचे नेते फेडोसीव्ह यांनी 'भौतिक व सामाजिक शास्त्राचा परस्परसंबंध' या विषयावर भाषण केले व म्हटले की आज जगापुढे उभ्या असलेल्या समस्या सोडविण्यासाठी दोन्ही प्रकारच्या शास्त्रांचा एकजुटीने वापर करावा लागेल. उदाहरणार्थ, अधिक प्रगती आणि लोकसंख्येचे नियमन हे प्रश्न केवळ भौतिक शास्त्रांच्या साहाय्याने सोडविता येणार नाहीत. त्यासाठी समाजशास्त्र व इतर संबंधित शास्त्रांचं अध्ययन व संशोधन करण्याचीही आवश्यकता आहे. रशियात भौतिक व पारंपरिक शास्त्रांच्या अध्ययनात सामाजिक शास्त्राचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्यामुळे शास्त्र आणि त्याची घडण याची विद्यार्थ्यांना अधिक चांगली जाणीव होऊ शकते.

## □ लोकसंख्येचा जागतिक स्फोट

एखादा डॉक्टर ज्या समाजाची सेवा करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण घेतो, त्या समाजाचे त्याला सखोल ज्ञान असल्याखेरीज तो आपली समाजसेवेची कामगिरी नीट बजावू शकणार नाही. ही उणीव भरून निघावी म्हणून पॅन–अमेरिकन हेल्थ ऑर्गनायझेशन (वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनचा पाश्चिमात्य विभाग) या संस्थेने डॉक्टरांना लोकसंख्या-शास्त्राचे ज्ञान करून देण्याच्या प्रश्नाकडे आपले लक्ष वळविले आहे व गेल्याच वर्षी आरोग्य व लोकसंख्याशास्त्राचा विभाग उघडला आहे. या विभागाचे प्रमुख व अमेरिकेतील एक निष्णात सर्जन डॉ. रेमंड ॲलन नुकतेच दिल्लीला झालेल्या जागतिक वैद्यकीय परिषदेत उपस्थित राहण्यासाठी आले होते. तेव्हा म्हणाले की, लोकसंख्येच्या वाढीचा कुटुंबावर व समाजावर इतका दूरगामी परिणाम होतो की, जनतेच्या आरोग्याला बराच धक्का पोचतो. बऱ्याच देशात–विशेषत:, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या कमी प्रगत देशात–अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कुटुंबनियोजन व इतर नियमन-साधनांचा विचार करणे हे वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनचे क्षेत्र नाही. हे प्रश्न त्या त्या देशांच्या सरकारवर सोपविणेच चांगले. परंतु सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आरोग्याच्या समस्येचे खरे स्वरूप डॉक्टरांच्या ध्यानात आणून द्यायला हवे. आपण प्रगतीची पावले टाकीत असलो तरी लोकसंख्या आपल्याही पुढे जात आहे, तेव्हा तिला गाठण्यासाठी आपल्याला धावले पाहिजे. एका स्त्रीने बालकाला जन्म देणे ही काही एकटी दुकटी घटना नाही. या घटनेमुळे इतर अनेक घटनांची मालिका सुरू होते. ●

X X X

# स. गो. बर्वे

# लो क शा ही स मा ज वा दा चे

सार्वत्रिक निवडणुकांचे झंझावाती वारे आता वेगाने साऱ्या भारतात वाहू लागले आहेत. मुंबईसारखी महानगरी तर सार्वत्रिक निवडणुकांच्या या धामधुमीत परस्परविरोधी प्रचाराची धमाल उडून अक्षरशः पेटून उठते. भारतातील सार्वत्रिक निवडणुकांचे आत्यंतिक चित्र मुंबईतच प्रकर्षाने उमटते.

गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत कृपलानी विरुद्ध मेनन हा उत्तर मुंबईतील लोकसभेच्या जागेचा



# प्रा मा णि क  प्र शा स क

सामना सर्व देशभर आणि देशाबाहेर कमालीचा गाजला होता. आता याही सार्वत्रिक निवडणुकीत असाच एक सामना मुंबईत धमाल गाजतो आहे.

मुंबईच्या उत्तरभागात घराघरावर, झाडांवर, भिंतींवर, पुलांवर प्रचंड भित्ती-पत्रके ठळक अक्षरांत लोकांना आवाहन करीत आहेत– "व्होट फॉर बर्वे", "व्होट फॉर मेनन." गेल्या दोन महिन्यांत भारतातील सारी प्रमुख वृत्तपत्रे सातत्याने एकच विषय मोठ्या चवीने चर्चीत आहेत – तो म्हणजे मुंबईच्या ईशान्य मतदारसंघातील लोकसभेच्या जागेची चुरशीची लढत. मुंबईतील हॉटेलांत, क्लबांत, सभास्थानी, घरोघरी, रेल्वेगाड्यांत आणि बसेसमध्ये हाच विषय जोरजोरात घोळला जात आहे –– मेनन – बर्वे लढा.

## वैयक्तिक की तात्त्विक !

ईशान्य मुंबई मतदारसंघातील लोकसभेच्या जागेसाठी होणारी ही लढत येत्या सार्वत्रिक निवडणुकीत सर्वाधिक गाजणार हे आता जवळ जवळ निश्चित झाले आहे. गेली कित्येक वर्षे काँग्रेसमध्ये राहून कडव्या समाजवादाचा हिरीरीने पुरस्कार करणारे आणि आता ' तत्त्वासाठी ' बाहेर पडलेले श्री. व्ही. के. कृष्ण मेनन आणि केवळ लोकसेवेसाठी आकर्षक सरकारी नोकरी सोडून सहा वर्षांपूर्वी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेले व आपल्या भाषणा–लिखाणांतून सतत समाजवादाचा पुरस्कार करीत असलेले श्री. सदाशिव गोविंद बर्वे यांच्यांतील या चुरशीच्या लढतीच्या प्रचाराला मुंबईत केव्हाच उधाण आले आहे.

श्री. बर्वे म्हणतात, " आमच्या लढतीतला मुख्य मुद्दा आहे तो वैयक्तिक नव्हे. देशाला श्री. मेनन यांचा साम्यवादी समाजवाद हवा आहे की लोकशाही समाजवाद हवा आहे असा खरा प्रश्न आहे. आणि तो आता जनतेने धसाला लावायचा आहे. "

श्री. मेनन यांना मिळत असलेल्या उघड कम्युनिस्ट पाठिंब्यामुळे त्यांच्या समाजवादाचा साम्यवादी कल आता निश्चित झाला आहे, असे बर्वे मानतात. ' माणूस ' प्रतिनिधीशी बोलताना श्री. बर्वे म्हणाले, " म्हणून आमची इच्छा असो नसो, आमच्या लढतीत साम्यवादी समाजवाद आणि लोकशाही समाजवाद यांमधील अपरिहार्य संघर्ष प्रखरपणे उभा राहणार आहे— "

श्री. मेनन यांचा आजचा पक्ष साम्यवादी समाजवादाचा आहे असे मानणारे श्री. बर्वे स्वत: लोकशाही समाजवादाचा सतत पुरस्कार करीत आलेले आहेत हे निश्चित. " रुळावर घातलेल्या आगगाडीप्रमाणे ठराविक चाकोरीत मोठमोठी ओझी वाहण्याच्या सरकारी नोकरीच्या " पिंजऱ्यातून बाहेर पडून " नवराष्ट्र निर्मितीत आपल्या शक्तिबुद्धीप्रमाणे अल्पस्वल्प हातभार लावण्यासाठी " बर्व्यांनी १९६१ साली काँग्रेसमध्ये प्रवेश केला तो काँग्रेसमध्ये लोकशाही समाजवाद आहे या श्रद्धेने. लोकशाही मार्गाने आणलेला समाजवादच देशाला उन्नतीच्या मार्गाने नेऊ शकेल अशी श्री. बर्वे यांची श्रद्धा आहे. काँग्रेसच्या समाजवादी धोरणाचे त्यांना आकर्षण होते. पण त्याचबरोबर काँग्रेसमधील दोष आणि उणिवाही ते जाणून होते. या उणिवा स्वत:हून अगोदर दाखवून त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला तो राजकारणात, समाजकारणात काही तरी करून दाखविण्याच्या ईर्ष्येने. प्रशासनाचे आपले कौशल्य आणि कर्तृत्व लोकसेवेत राबविण्याच्या इच्छेने त्यांनी मानाची नोकरी सोडून स्वेच्छेने राजकारणात उडी घेतली.

दुर्दैवाने राजकारणात श्री. बर्वे यांच्या पात्रतेप्रमाणे भरघोस कामगिरी करून दाखविण्याची पुरेशी संधी प्रचलित राजकारणामुळे त्यांना अजून मिळाली नाही. या बुद्धिमान आणि कर्तबगार पुरुषाची महाराष्ट्रातील प्रचलित राजकीय शक्तींनी

काहीशी उपेक्षाच केली. मात्र श्री. लाल बहादूर शास्त्री यांच्या गुणग्राहकतेमुळे भारतीय पातळीवर नियोजन मंडळाचे सदस्य म्हणून ते चांगलाच नावलौकिक कमावू शकले. आपले समाजवादी विचार श्री. बर्वे सतत सुसंगतपणे, कर्तव्यबुद्धीने प्रकट करीत आले आहेत. श्री. बर्वे कुशल आणि धडाडीचे प्रशासक म्हणून सरकारी नोकरीत गाजले. हे आपले प्रशासकीय गुण राजकारणात उपयोगात आणण्याची पुरेशी संधी आजवर आपल्याला मिळाली नाही याचे त्यांना वाईट वाटते. पण तरी प्रयत्नांची जिद्द अद्याप त्यांनी सोडली नाही. लोकसेवेसाठी एकदा राजकारणात उडी घेतली, आता मागे येणे नाही हा त्यांचा निर्धार.

## पुण्याचे 'टेरर'

राजकारणात पडण्याची म्हणा किंवा लोकसेवेची म्हणा श्री. बर्वे यांना खरे म्हणजे प्रथमपासूनच ईर्ष्या होती. विश्वविद्यालयीन जीवनातील त्यांचे सहाध्यायी याविषयी हवाला देतात. पण श्री. बर्वे हे वडिलांचे एकुलते एक पुत्र. त्यामुळे सरकारी नोकरी करण्याकडे मनाचा कल नसतानाही केवळ वडिलांच्या अपेक्षांना मान देऊन सनदी नोकरी त्यांनी स्वीकारली. त्यांचा जन्म २७ एप्रिल १९१४ चा. त्यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पुण्यालाच न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्युसन कॉलेजमध्ये झाले. विश्वविद्यालयाच्या प्रत्येक परीक्षेत विविध विषयांत पहिले क्रमांक मिळवूनही इतर महाविद्यालयीन कार्यक्षेत्रात श्री. बर्वे मनापासून भाग घेत असत. एक प्रभावी आणि तर्कशुद्ध विचार मांडणारे वक्ते म्हणून त्यांनी महाविद्यालयापासूनच नाव कमाविले. त्यांची भाषणे ध्येयनिष्ठेने भारलेली असत. आणि त्यात त्यांचा कलही स्पष्ट दिसे. पण पुढे परिस्थितीमुळे त्यांना सरकारी नोकरी स्वीकारावी लागली. वयाच्या एकविसाव्या वर्षी केंब्रिज विद्यापीठाची अर्थशास्त्राची पदवी त्यांनी मिळविली. त्याच वेळी ते आय. सी. एस्. ची परीक्षाही उत्तीर्ण झाले. आणि त्यांची लगेच पुढे अहमदाबादचे असिस्टंट कलेक्टर म्हणून नेमणूक झाली.

श्री. बर्वे यांनी आपल्या सरकारी नोकरीत एक निस्पृह, कर्तबगार आणि लोकहितदक्ष अधिकारी म्हणून चांगलाच नावलौकिक मिळवला होता. हिंदूमुसलमान दंग्याच्या वेळी ते अहमदाबादचे कलेक्टर होते. तसेच गांधी वधानंतर पुण्यात जो दंगा झाला त्या वेळी ते पुण्याचे कलेक्टर होते. या दोन्हीही प्रसंगी त्यांनी मोठ्या योजकतेने आणि कुशलतेने आपली कामगिरी पार पाडली. 'बर्वे कलेक्टर नसते तर ४८ सालीच अर्वे पुणे जळून गेले असते,' असे अजूनही पुण्याचे लोक म्हणतात. मोटर सायकलवरून हिंडणारे बर्वे म्हणजे पुण्यात त्या वेळी विलक्षण 'टेरर' होते.

१९४९ साली पुणे महानगरपालिकेची स्थापना झाली तेव्हा पुण्याचे पहिले कमिशनर म्हणून बर्व्यांचीच नियुक्ती झाली. पुण्यात त्यांनी धडाडीने घडवून आणलेल्या सुधारणा अजूनही पुणेकरांच्या लक्षात आहेत. त्यांच्या कार्यक्षमतेचे आणि

धडाडीचे एकच उदाहरण द्यायचे म्हणजे पुण्यातील संभाजी पुलाच्या डेक्कन जिमखाना भागाकडील बाजूचे कारंजे. पूर्वी तेथे एक छोटेसे दर्ग्यासारखे बांधकाम होते. रस्ता रुंद करून रहदारीच्या सोयीसाठी तो दर्गा तेथून हलविणे भाग होते. पण मुसलमानांचा कडवा विरोध होता. गावात तंग वातावरण होते. पण बर्व्यांना ठरल्याप्रमाणे करावयाचे होते. त्यांनी एके दिवशी रातोरात स्वत: जातीने हजर राहून मजुरांकरवी तो दर्गा हलविला. दुसरे दिवशी लोक बघतात तो ती जागा सपाट !

## प्रशासकीय कर्तबगारी

पुणे महानगरपालिकेचीही त्यांनी बरीच साफसूफ केली. भारतीय नोकरशाहीला श्री. बर्वे नेहमी एखाद्या तंतुवाद्याची उपमा देतात. वरून तंबोऱ्याच्या एक-दोन खुंट्या पिळल्या की तंबोरा सुरेख वाजू लागतो. भारतीय नोकरशाही जगातल्या कोणत्याही नोकरशाहीच्या तोडीची आहे असे ते मानतात. आज ती गलथान, भ्रष्ट, दीर्घसूत्री, अकार्यक्षम आणि बदसूर झालेली दिसते. कारण वर असा खुंट्या पिळणारा कणखर, सचोटीचा माणूस नाही. या नोकरशाहीला ताळ्यावर आणणे सोपे काम आहे. वरच्या खुंट्या पिळल्या की झाले, असे ते म्हणतात. श्री. बर्वे यांचा नोकरशाहीतील अनुभव लक्षात घेता त्यांच्या या मताला निश्चितच महत्त्व आहे.

१९५२ साली श्री. बर्वे मध्यवर्ती सरकारात सी. डी. देशमुखांच्या वेळी अर्थखात्याचे सहसचीव म्हणून गेले. अंतर्गत अर्थव्यवस्थेचे खाते त्यांनी या काळात कुशलतेने सांभाळले. इंपीरियल बँकेचे राष्ट्रीयीकरण, क्रेडिट पॉलिसीज आणि बँकिंग व्यवसायामधील इतर सुधारणा या घटनांशी ते घनिष्टपणे निगडित होते. १९५५ साली भाषा कमिशनचे सेक्रेटरी म्हणून भारतीय घटनेनुसार त्यांची खास नेमणूक करण्यात आली होती. भारतातील भाषाविषयक समस्यांचा उलगडा करून राष्ट्रभाषेचे व प्रादेशिक राज्य भाषांचे स्थान निश्चित करण्याचे नाजुक आणि जिकिरीचे काम पार पाडण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. ती त्यांनी कौशल्याने पार पाडली.

त्यानंतर श्री. बर्वे पुन्हा मुंबई राज्य सरकारकडे आले. मुंबई राज्यात त्यांनी वेगवेगळ्या पदांवरून महत्त्वाच्या कामगिऱ्या बजाविल्या. स्टेट ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशनचे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. तसेच राज्याच्या पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटचे सेक्रेटरी म्हणून त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजाविली. मुंबई नगरीच्या प्रश्नोपप्रश्नांचा कसून अभ्यास करून शहराच्या समस्यांवर तोडगे सुचविण्यासाठी १९५८ साली नेमण्यात आलेल्या खास अभ्यासमंडळाचे श्री. बर्वे हे अध्यक्ष होते. या अभ्यासमंडळाने सादर केलेला अहवाल मुंबईच्या प्रश्नांवरील आणि त्यांवरील तोडग्यावरील एकमेव वस्तुनिष्ठ अहवाल मानला जातो. कोयना धरणासाठी कर्ज मिळविण्याची जागतिक बँकेशी बोलणी करण्यासाठी म्हणून १९५९ साली जे शिष्ट-

मंडळ पाठविण्यात आले त्याचे श्री. बर्वे नेते होते. १९६०–६१ साली महाराष्ट्राच्या पाटबंधारे आणि वीज खात्याचे चिटणीस म्हणून काम केल्यावर जुलै १९६१ मध्ये ते सरकारी नोकरीची मुदत संपण्यापूर्वी चौदा वर्षे आधीच राजकारणात पडण्यासाठी म्हणून सेवानिवृत्त झाले. १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत पुण्याच्या मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेसाठी ते प्रचंड बहुमताने निवडून आले आणि महाराष्ट्राचे अर्थखाते त्यांच्याकडे आले.

## शक्ती संपादनातील अडचणी

प्रशासनाचा एवढा दांडगा अनुभव असल्याने प्रत्यक्ष राजकारणात आपण बरीच मोठी कामगिरी पार पाडू शकू, असा श्री. बर्वे यांना विश्वास होता. "जबाबदारीच्या नोकरीत राहण्यापेक्षा राजकारणात पडून लोकसेवा अधिक प्रभावीपणे करता येते काय? याविषयी आपला अनुभव काय?" असे 'माणूस' प्रतिनिधीने विचारताच थोडे थांबून आणि विचार करून श्री. बर्वे म्हणाले, "त्याचे असे आहे, "पाठीशी काही शक्ती असल्याशिवाय माणूस राजकारणात काही करू शकत नाही. ज्यांच्यापाशी राजकीय शक्ती आहे अशीच माणसे राजकारणामध्ये काही भरीव कार्य करू शकतात."

थोडे अधिक थांबून श्री. बर्वे पुढे म्हणाले,–"आणि राजकीय शक्ती संपादन करण्याच्या बाबतीत माझ्या स्वतःच्या अशा काही खास अडचणी आहेत. तरीही करता येईल तेवढ्या प्रमाणात शक्ती संपादन करण्याचा प्रयत्न मी करतो आहे. त्यासाठी प्राप्त राजकीय प्रेरणांशी समरूप झाले पाहिजे. अर्थात अवघ्या ४–५ वर्षांत म्हणण्यासारखी राजकीय शक्ती संपादन करणे कठीणच. परंतु मला एक माहीत आहे. मी मांडलेले विचार सर्वत्र देशभर ऐकले जातात आणि त्यांची दखल घेतली जाते. हेही काही थोडके नाही."

"शक्ती संपादनामागील आपली अडचण म्हणजे जातच ना?"

"— अं! महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीत ह्या गोष्टीला अजून महत्त्व आहे खरे.

"म्हणजे काँग्रेस हा जातीयवादी पक्ष आहे हे आपणही कबूल करता"– प्रतिनिधी.

"आपल्या समाजातच जातीयवाद एवढा मुरला आहे की तो जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात येतोच. काँग्रेस हे भारतीय समाजाचे खरेखुरे प्रतिबिंब आहे. त्यामुळे काँग्रेसमध्ये, तसाच इतरही पक्षांत जातीयवाद येणे अपरिहार्य आहे. पण काँग्रेसची स्पष्ट तात्विक भूमिका तरी जातीजमातींचे संकुचित वादप्रवाह ओलांडून राष्ट्रीय तादात्म्य निर्माण करण्याची आहे. आणि तशा प्रेरणा काँग्रेसमध्ये कमी-अधिक प्रमाणात सतत प्रभाव पाडीत असतात."– श्री. बर्वे

## एकपक्षीय लोकशाहीचा प्रयोग

श्री. बर्वे हे काँग्रेसमधील नेमके दोष आणि उणिवा ओळखून आहेत. त्याविषयी

त्यांनी वारंवार लिहिले आहे आणि त्यावर टीकाही केली आहे. आजची काँग्रेस काहीशी भ्रष्ट आहे, तिच्यामध्ये घडाडी नाही, पूर्वीची निष्ठा उरली नाही आणि नेतृत्वाची पातळीही खालावली आहे हे श्री. बर्वे मान्य करतात आणि तरीही " देशाच्या पुढे असलेली आव्हाने स्वीकारण्याची क्षमता असलेला व सध्याच्या कठीण काळातून देशाला धीराने पुढे नेण्याला समर्थ असा काँग्रेसखेरीज दुसरा पक्ष आपल्या देशात नाही, " असे त्यांना वाटते. काँग्रेसप्रवेश करताना त्यांनी आपली ही भूमिका स्पष्ट केली होती. त्याचप्रमाणे काँग्रेसमधील या साऱ्या उणिवा आणि सारे दोष नाहीसे करता येतील, त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न मात्र हवेत अशीही त्यांची श्रद्धा आहे.

काँग्रेस संघटनेतील या उणिवा दूर करण्यात गेल्या चार-पाच वर्षांत आपणाला कितपत यश मिळाले ? " या प्रश्नाला श्री. बर्वे यांचे उत्तर आहे.

" संघटनेतील उणिवा दूर करणे हे संघटनेतील स्थानावर अवलंबून असते. विचारप्रवर्तन करून जेवढे शक्य आहे, तेवढे मी करीत आलो आहे."

" मग लोकसेवा करण्यासाठी राजकारणातच पडले पाहिजे का ? "—– एक प्रश्न. त्यावर श्री. बर्वे म्हणाले, " सध्या राजकीय सत्ता एवढी सर्वव्यापी झाली आहे की सेवेच्या कोणत्याही क्षेत्रात तिचा स्पर्श होतोच. कोणतेही भरीव काम हाती घेतले तरी राजकारणाशी संबंध येणे अपरिहार्य झाले आहे. राजकारणाच्या म्हणा किंवा सरकारी क्षेत्राच्या म्हणा फारसे बाहेर असं काही राहू शकत नाही."

**प्रश्न :** मघा आपण म्हणाला होता, जबाबदाऱ्या पेलू शकेल असा विरोधी पक्ष म्हणून काँग्रेसला पर्याय नाही. आपण असेही म्हणता की सर्व मतमतांतरांचे प्रतिनिधित्व काँग्रेस करते. विभिन्न राजकीय मतप्रणालींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या काँग्रेसच्या अट्टाहासामुळेच विरोधी पक्षांच्या वाढीला वाव राहत नाही असे आपणाला वाटत नाही काय ?

**श्री. बर्वे :** बरोबर आहे. पण ते काही काँग्रेसचे वैगुण्य नव्हे. आपल्या देशातील परिस्थितीच तशी आहे. इतर देशांतील पक्ष वर्गावर आधारलेले असतात. काँग्रेस पक्ष तसा कुठल्याही एका वर्गाचा नाही. काँग्रेसमध्ये सर्व वैचारिक, आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक स्तर प्रतिबिंबित होतात. त्यामुळे दुसऱ्या कोणत्याही पक्षाला निश्चित वर्गाची भूमिका घेणे कठीण होते, यात काँग्रेसचा तरी काय दोष ? सर्व वर्गांच्या पाठीशी राहू नये असे थोडेच आहे ?

**प्रश्न :** ते ठीक आहे. परंतु अंतर्गत मतवैचित्र्यामुळे काँग्रेसची धोरणे स्पष्टपणे निश्चित होऊ शकत नाहीत त्याचे काय ? आणि झाली तरी त्यांची योग्य दिशेने अंमलबजावणी होत नाही हे खरे नाही काय ?

**श्री. बर्वे :** धोरण ठरायच्या आधी त्या त्या विषयांवर सर्व तऱ्हेची साधकबाधक अशी खुली चर्चा होऊ शकते. पण धोरण स्पष्ट ठरल्यावर ते निर्धारपूर्वक अंमलात

आणले गेले पाहिजे हेही खरे आहे.

द्विपक्ष राज्यपद्धती भारतात नजीकच्या काळात तरी येणे अशक्य आहे, असे श्री. बर्वे यांना वाटते. त्यामुळे सध्याच्याच एकपक्षीय संविधानक लोकशाहीचे पावित्र्य राखण्यासाठी, सत्तारूढ पक्षावर लगाम ठेवण्यासाठी आपल्या लोकशाहीच्या ढाच्यात लोकपाल आणि सांसदीय समित्या यांसारख्या तरतुदी करणे आवश्यक आहे असे ते म्हणतात. एकपक्षीय लोकशाही ही कशी यशस्वी करायची याचे नवे तंत्र भारताने शोधून काढले पाहिजे, असे त्यांना वाटते. "भ्रष्ट माणसे राजकारणात येतच राहणार. आजही हा भ्रष्टाचार आहेच. वरच्या पातळीवरील भ्रष्टाचार कमी झाला की खालच्या पातळीतील भ्रष्टाचार आपोआप कमी होतोच. तेव्हा हा वरच्या पातळीवरचा भ्रष्टाचार नाहीसा करण्यासाठी प्रभावी यंत्रणा शोधून काढणे आवश्यक आहे, तरच एकपक्षीय लोकशाही आपल्या देशात यशस्वी होईल."

## मजबूत पाया

अर्थकारणाचा श्री. बर्वे यांचा विशेष अभ्यास. महाराष्ट्राचे अर्थमंत्री म्हणून त्यांनी काम केले. तसेच भारताच्या आर्थिक नाड्या हाती असणाऱ्या सर्वोच्च संघटनेत– नियोजन मंडळातही – त्यांनी जबाबदारीचे काम केले आहे. आर्थिक विषयावर आपले मतप्रदर्शन करताना श्री. बर्वे म्हणाले, "भारत सध्या संक्रमणावस्थेत असल्याने बऱ्याच अडचणी देशापुढे येणे अपरिहार्य आहे. त्यामुळे खूपशा चुका होतातही व बऱ्याच गोष्टी बिघडतातही. पण याचा अर्थ असा नव्हे की भारतीय अर्थव्यवस्था कोलमडण्याच्या बेताला आहे. थोडासा पापुद्रा उलगडून पाहिला तर अर्थव्यवस्थेचा खालचा स्तर अगदी भक्कम आहे असे दिसून येईल."

श्री. बर्वे पुढे म्हणाले, "भारताजवळची आर्थिक ताकद भक्कम आहे. ती वापरायची कशी हा खरा प्रश्न आहे. भांड्यात पाणी ओतण्यासारखं हे आहे. पाणी ओतताना थोडं पाणी आजूबाजूला सांडतंच. हे पाणी सांडणं कमीत कमी झालं पाहिजे असा आपला प्रयत्न हवा. पण बरंचसं पाणी भांड्यात पडतंय आणि भांडं भरत राहतं आहे हेही विसरून चालणार नाही."

ते पुढे म्हणतात, "आपल्या देशाच्या परिस्थितीचं वर्णन करायचं झालं तर कुंपणंच जिथं तिथं शेतं खायला लागली आहेत असं म्हणावं लागेल. सगळे लोक आपापल्यापुरते पाहतात. कारखाने चालतात ते मालकांसाठी किंवा कामगारांसाठी. गिऱ्हाइकासाठी नाही. शाळा चालतात शिक्षकांसाठी आणि राजकारण चालतं पुढाऱ्यांसाठी. ही कोंडी फोडायला हवी."

तरीही आर्थिक प्रगतीच्या बाबतीत श्री. बर्वे भक्कम आशावादी आहेत. ते म्हणाले, "आपल्या देशाची आर्थिक मुळे एवढी भक्कम आहेत की कुणी कितीही

[पृष्ठ ६२ वर चालू]

## प्रेमाचा त्रिकोण

" पृथ्वी ही फिरते सदा स्वभवती तीते सदा छेडिती
रात्रंदिन रवी शशी मुदली ना पिच्छा तिचा सोडिती
बाई माणूस एकटीच दिसता तीते सदा छेडणे
हा बाणा पुरुषी पुरातन असे ज्यातून झाली रणे
दोघे पाळत ठेविती बदलुनी आपापली वेळ ही
प्रेमाचा असला त्रिकोण बनला झाली युगे त्यासही
होई काय पुढे कुणा नच कळे माझी मती गुंगली "
कॉलेजातिल पोरिने स्वकविता सम्मेलनी गायली
टाळ्यांचत्रा गजरात स्वागत तिचे झाले चहू बाजुंनी
तेव्हा ती कवयित्रिही कितितरी आनंदली मन्मनी
बाई ऐक पुन्हा न गूढ कसले हा सूर्य पृथ्वी पिता
पृथ्वीचा सुत चंद्र हे शिकविले ध्यानी असू दे अता

*—हरिसुत शिरवळकर*

## शुभ्र कबूतर

अंधाराचे पंख पसरता
उडते माझे शुभ्र कबूतर
वरती खाली स्वैर भटकते
जाणिव नेणिव पुरते अंतर ॥१॥
पर्वत श्रेणी कधी स्पर्शते
उभे ओणवे खोल दरीवर
अगोचराची मनी लालसा
हुंकाराची साथ निरंतर ॥२॥
गर्व चालतो ठुमकत ठुमकत
ऐटदार ती मान मोडुनी
अव्यक्ताचा वेचित दाणा
नियतीच्या या उभ्या जीवनी ॥३॥

*—वि. के. देशपांडे*

## श्रावण फूल

विस्कटले गहिरे जलद-कमल-दल नील,
वर्षेची केवळ निर्माल्यस्मृति आहे
हो अगतिक अनिल नि अचेतनांकित राने
सौंदर्यभग्नता नभ-भरल्या तिमिराने
नयनातिल सरल्या जलधारा, तरिही हे-
नभ उगाच फुलवी श्रावण फूल मलूल !

*—चंद्रकांत पाटील*

# आस्वाद

'प्रेमाचा त्रिकोण' फार प्राचीन आहे. हरिसुत शिरवळकर निसर्गावरून त्याची एक गमतीदार कथा सांगतात. सूर्य आणि चंद्र हे पृथ्वीच्या मागे लागले आहेत, अशा कल्पनेवर आधारलेली कविता एक कॉलेजकुमारी म्हणते. तेव्हा कविमहाशय तिला सूर्य हा पृथ्वीचा पिता आणि चंद्र हा मुलगा आहे असे समजावून देतात! स्त्री-पुरुषांमधले नाते एकच म्हणजे शरीराकर्षणावर आधारलेले असते, असा गैरसमज समाजात सर्वत्र सर्वकाळी असतो. त्यांचे हे विडंबन उत्तम आहे. 'स्वभवती', 'मुदली' असले विचित्र शब्द आणि 'रात्रंदीन' अशी अशुद्ध रचना असूनही भापेला ओघ आहे. मात्र पृथ्वीला छेडण्याची कल्पना एका मुग्ध कॉलेजकन्येच्या काव्यात यावी यात तितकेसे प्रसन्न वाटत नाही.



'श्रावण फूल' कानाला मोहक लागते. लुसलुशीत संस्कृत शब्दांच्या पेरणीने त्याला मुलायम केले आहे. चंद्रकांत पाटील यांनी सौंदर्यवादी औदासीन्याचे थोडक्यात चित्रण केले आहे. असे औदासीन्य आनंदापेक्षाही कित्येकदा मोहक असते. पण असे वाटते की पर्वकाल गेल्यावर स्वच्छ झालेले नीलाकाश रंजवू का शकत नाही? श्रावणाची स्तुती ही या सुंदर आकाशाहून अधिक आकर्षक असेल का?

'शुभ्र कबूतर' हे मुमुक्षू मनाचे प्रतीक वाटते जडतेला सोडून उंच उडावे, स्वैर फिरावे, अज्ञानात भटकावे आणि अलौकिक आनंदाचे कण वेचावेत असे मनाला वाटत असते. हेच सारे वि. के. देशपांडे यांनी पल्लेदार शब्दांत रंगविले आहे. अव्यक्ताचा दाणा टिपायचा तोही नियतीच्या वर्तुळातच टिपावा लागतो असे देशपांड्यांना सुचवायचे आहे काय? जाणीव नेणीवेच्या पलीकडे गेल्यावर नियतीचा बंध कुठे राहणार? पण अशी शंका कवितेच्या रसग्रहणाला फारशी मारक होत नाही.

—गोपीनाथ तळवळकर

एक वर्षापूर्वी स्पेनमध्ये हरवलेल्या
हैड्रोजन बाँबच्या शोधाची विलक्षण कथा

# तुटलेला बाण

मूळ लेखक : जॉन ह्युबेल

संक्षिप्त रूपांतर : कमलाकर

**१७ जानेवारी १९६६ !**

स्पेनमधील व्हिलॅरिकास ह्या समुद्रकाठच्या एका लहानशा गावात सॅन ॲन्टॉन द आबाद ह्या संताच्या सणाचा दिवस होता तो. त्याचा उत्सव गावभर सुरू होता. चर्चमधून प्रार्थना होत होत्या व घंटांच्या आवाजाने सारे गाव निनादत होते. सर्वांच्या उत्साहाला जणू उधाण आले होते.

**अचानक अपघात झाला**

अशा वेळी प्रचंड स्फोट झाल्याचा आवाज कानी आला. चर्चमध्ये असलेले लोक जागच्या जागी चुळबूळ करू लागले. जे चर्चमध्ये नव्हते, ते घराबाहेर धावत आले. बाहेर येऊन त्यांनी अवकाशाकडे नजर फेकली आणि सर्वांच्या काळजात चर्रर्र झाले. आकाशात एक

पेट्रोलवाहू विमान व बॉंबर यांची पेट्रोल भरताभरता ३१,००० फूट उंचीवर टक्कर झाली होती. प्रथम बॉंबर विमानाचे तुकडे उडाले व प्रत्येक तुकड्याला धुराचे शेपूट फुटले. बघता-बघता ते तुकडे धुराच्या प्रचंड ढगाआड दिसेनासे झाले. पाठोपाठ पेट्रोलवाहू विमान पण पेटले व खाली कोसळू लागले. विमानाच्या त्या पेटलेल्या तुकड्याकडे पाहताना आकाशातून अग्निवर्षाव होत असल्यासारखे वाटत होते.

आकाशातून येणाऱ्या अग्निगोलकाकडे पाहून ज्युलिओ नॅवॅरोने लिंबाच्या झाडांना पाणी देत असलेल्या आपल्या बायकोला हाक घातली, "मरिया, मरिया, आकाशातून आग येतेय पळ."

मरिया हातचं काम सोडून त्याच्या रोखाने धावत आली व दोघांनी वरून वेगाने येणाऱ्या त्या आगीपासून दूर पळण्यास सुरुवात केली.

पळता पळता मरियाने मागे बघितले, तसा एक प्रचंड अग्निगोलक त्यांच्या घराच्या रोखाने वेगाने येताना तिला दिसला.

"अरे देवा," ती जवळ-जवळ किंचाळलीच. तिच्या मनःश्चक्षूंसमोर क्षणार्धात वाताहत झालेले त्यांचे घर तरळून गेले. दुःखावेगाने तिने आपली मान ज्युलिओच्या खांद्यावर टाकली आणि ती रडू लागली.

"मरिया, ए मरिया, आपलं घर बचावलं बघ." ज्युलिओ म्हणाला.

मरियाने बघितले त्यांच्या घराच्या रोखाने प्रचंड वेगाने येत असलेला अग्निगोलक झपाट्याने त्यांच्या घरावरून पलीकडे शंभर फुटांवर जाऊन पडला होता. त्या ठिकाणाहून धुराचे लोट वर उठत होते.

ज्युलिओ व मरिया त्या आगीच्या रोखाने धावतच गेले. आकाशातून जळत खाली कोसळलेली ती वस्तू विमानाचे कॉकपिट् होते. त्यामध्ये दोन वैमानिक मरून पडले होते व तिसरा त्या ज्वालांतच कण्हत होता. आगीच्या लोटामुळे त्याची सुटका करणे अशक्य झाले होते. त्या दोघांनी खालची माती भराभर त्या आगीवर फेकायला सुरुवात केली. पण आग प्रचंड होती व त्यांचे हात अपुरे होते. त्या पसरणाऱ्या आगीने कण्हणाऱ्या वैमानिकांचा कोळसा केला ! ज्युलिओ व मरियाने आपली मस्तके खाली झुकविली !

विमानांचे पेटलेले तुकडे असे सर्वत्र विखुरले जात असतानाच आकाशात रंगीबेरंगी हवाई छत्र्या उघडल्या गेल्या. त्यांना लटकून काही माणसं, तर काही चकाकणाऱ्या वस्तू हळू-हळू खाली उतरू लागल्या.

त्या हवाई छत्र्यांपैकी एक अॅलरकॉनच्या शेतात पडली. एक माणसाची आकृती व त्याच्या पाठीवर एक प्रचंड दिसणारे काहीतरी.

अॅलरकॉन धावतच त्या छत्रीकडे गेला. छत्रीच्या आधाराने उतरलेली व्यक्ती विमानाचा राडार नियंत्रक मेजर बुचनची होती. विमानात तो ज्या सीटवर बसला

होता, त्या सीटसकटच तो खाली आला होता. त्या सीटचा मार बसून त्याच्या पाठीचे मणके मोडले होते. त्याचा डावा डोळा भाजून काळानिळा झाला होता आणि भीतीने तो केवळ पुटपुटत होता, "मला थंडी वाजते !" ॲलरकॉनने त्याला खुर्चीपासून अलग केले व आपल्या कुटुंबियांच्या मदतीने त्याला दवाखान्यात पोचते केले.

## शेतात सापडलेला हैड्रोजन बाँब

ह्या हवाई अपघातात तेलवाहू विमानातले चारहीजण ठार झाले होते. बाँबर-मधील तिघेजण ठार झाले होते व तिघेजण मेले नव्हते म्हणून जिवंत राहिले होते. पण एवढा प्रचंड अपघात होऊन जमिनीवर असलेल्या एकाही व्यक्तीला इजा झाली नव्हती वा एकाही इमारतीला धक्का लागला नव्हता.

तेथून जवळच असलेल्या पालोमेअरच्या पूर्वेकडे असलेल्या एका शेतात विमानातून कोसळलेली एक वस्तू जोराने आदळली. त्या आघाताने शेतातील एक भिंत कोसळली आणि शेकडो टोमॅटो नष्ट झाले. तेथूनच जवळच असलेल्या शेतमालकाच्या–पोर्टिलोच्या–दाराच्या व खिडक्यांच्या एकूण एक काचा निखळून पडल्या. पोर्टिलो व त्याच्या घरातील इतर धावतच शेतात गेले. शेतात जळत पडलेल्या वस्तूवर माती फेकून त्यांनी ती आग प्रथम विझवली. पण त्यांना त्या वेळी कल्पनासुद्धा नव्हती की ज्या वस्तूवर ते माती फेकत होते ती वस्तू म्हणजे प्रचंड विध्वंसक शक्ती असलेला हैड्रोजन बाँब होता !

हा अपघात होत असताना अवकाशात असलेल्या दुसऱ्या पेट्रोलवाहू विमानाने माद्रिदजवळ असलेल्या विमानाकडे संदेश पाठविला, "बी– ५२ ला आग लागली असून ते खाली कोसळत आहे. दुसरे के. सी.– १३५ विमानसुद्धा नियंत्रणाबाहेर गेले आहे."

मेजर जनरल विल्सनला हा संदेश मिळताच त्याने नेवासा येथे मेजर जनरल आयसेनहार्टला संदेश दिला. "Broken Arrow in Spainln". Broken Arrow म्हणजे –तुटलेला बाण– हा आण्विक अपघाताचा सांकेतिक अर्थ होय.

ही बातमी कळताच आयसेनहार्टने उलट संदेश दिला, " मिळेल त्या साधनांनिशी घटनास्थळी पोहोचा. बी– ५२ मध्ये असलेले चार हैड्रोजन बाँब प्रथम हस्तगत करा. अगदी ताबडतोब."

अमेरिकेचे आजवर ११ आण्विक अपघात झालेले आहेत. पण परकी भूमीवर झालेला हा पहिलाच अपघात होता. अशा अपघातातून अनेक राजकीय प्रश्न निर्माण होण्यासारखे होते. अमेरिकाविरोधी प्रचार करायला कम्युनिस्ट राष्ट्रांना आणखी एक संधी मिळणार होती. ह्या गोष्टी ध्यानात ठेवून माद्रिद येथे स्पेनचे लष्करी सल्लागार असलेले अमेरिकेचे मेजर जनरल डोनोव्हर यांनी प्रथम अमेरिकेच्या स्पेन-मधील राजदूताशी–अँजियर बिडल ड्यूक ह्यांच्याशी संपर्क प्रस्थापित केला. ड्यूक

ह्यांनी स्पेनच्या परराष्ट्रमंत्र्यांची गाठ घेऊन या घटनेतील नाजूक बाबी समजावून दिल्या.

प्रत्येक हैड्रोजन बाँब हा त्याच्या कामगिरीसाठी सुयोग्य असा तयार केलेला असतो. त्याला औष्णिक अण्वनिर्मिती करणारी साधने जोडलेली असतात. प्रत्येकाला स्वतःची ज्वालोत्पादक नळी व क्षेपणास्त्रे जोडलेली असतात. स्फोट होण्यासाठी त्या स्फोटकामधील अणुशक्तीवर दाब द्यावा लागतो. तो दाब येण्यासाठी T. N. T. सारखी स्फोटक द्रव्ये वापरलेली असतात. ह्या द्रव्याचा अणुकवचांतर्गत स्फोट केल्यावर, त्या स्फोटाचा दाब अणुकवचावर पडतो. हा दाब समप्रमाणात पडला तरच हैड्रोजन बाँबचा स्फोट होऊ शकतो, एरव्ही नाही. कारण, अण्वस्त्रांची पूर्वचाचणी घेतलेली असते. अती उंचावरून काँक्रीटच्या भितीवर आदळला तरी तो धक्का सहन करण्याची ताकद असते. त्यामुळे अपघाताने अणुबाँबचा स्फोट ही अशक्य कोटीतील गोष्ट आहे. ह्या एकाच गोष्टीमुळे अमेरिकेला अणुस्फोटाची मीती नव्हती पण ते बाँब ताबडतोब हस्तगत करणे मात्र आवश्यक होते.

स्पेन हे अमेरिकेचे मित्रराष्ट्र असल्यामुळे स्पेन सरकारने हैड्रोजन बाँबच्या शोधासाठी सर्वतोपरी साह्य देण्याचे कबूल केले व स्पेनच्या पोलिस पथकांना तसे आदेश पण मिळाले.

विमानाच्या अवशेषांचा शोध घेणे हे काही फारसे कठीण काम नव्हते, कारण जळक्या अवशेषांतून धुराचे लोट उठत होते. पोलिसांनी प्रथम हे सारे अवशेष एकत्र केले. हे अवशेष एकत्र करीत असतानाच नदीच्या कोरड्या पात्रात एक बाँब पडलेला दिसला. शोध घेण्याचे काम करणारी नियंत्रक तुकडी लगेच तेथे येऊन पोचली व त्यांनी तो हैड्रोजन बाँब असल्याचा निर्वाळा दिला.

एक बाँब सापडल्यामुळे बाकीचे बाँबदेखील लवकरच हस्तगत करता येतील, असे वाटू लागले. संध्याकाळपर्यंत नियंत्रक तुकडीचे लोक, साठ स्पॅनिश पोलिस व त्यांना साह्य करणारी तीन हेलिकॉप्टर्स यांनी एक मैल प्रदेशाचा कानाकोपरा धुंडून काढला. हे काम अर्थातच सोपे नव्हते. कारण, सर्वत्र शेतजमिनी होत्या व त्यांवर टोमॅटोचे पीक बहरास आले होते. पीक बाजूला सारून शोध घेणे मोठे जिकिरीचे झाले होते. भुसभुशीत जमिनीत पाय रुतत होते. त्यामुळे पाऊल पुढे टाकताना अत्यंत कष्ट होत होते.

आकाशातून मागोवा घेत असलेल्या हेलिकॉप्टरने बऱ्याच भ्रमंतीनंतर एका बाँबचा शोध घेतला. तो एका थडग्यापाशी पडला होता. पाठोपाठ पोर्टिलोच्या टोमॅटोच्या शेतात आदळलेला तिसरा बाँब पण सापडला. आता फक्त एकच बाँब सापडायचा शिल्लक राहिला होता.

सापडलेल्या हैड्रोजन बाँबपैकी दोन बाँबचे बरेच नुकसान झाले होते. पण अणुच्या विघटनाची क्रिया झाली नव्हती. त्यामुळे गॅमा किरणांऐवजी अल्फा किरणेच तेवढी

परावर्तित होत होती. त्या किरणांची शक्ती व एकूण पल्ला कमी असल्यामुळे त्यांचा तितकासा धोका वाटत नव्हता.

### उरलेला बाँब ?

तीन बाँबचा शोध लागल्यामुळे चौथ्या बाँबचा शोध घेण्याचे कार्य अधिक तडफेने हाती घेण्यात आले. ज्यांनी ज्यांनी अपघात होताना बघितला होता, त्यांना त्यांना अधिक तपशील देण्यासाठी आवाहन करण्यात आले. त्यांची उलटतपासणी करण्यात आली. त्यांपैकी फ्रॅन्सिस्को सिमो ह्या कोळ्याकडून जी माहिती मिळाली तीवरून चौथा बाँब समुद्रात पडला असावा असा अंदाज करण्यात आला.

त्याचा पडताळा घेण्यासाठी नौदलाला पाचारण करण्यात आले. जानेवारी २३ तारखेस – अपघात घडल्यापासून सहा दिवसांनी – रिअर ॲडमिरल विल्लियम गेस्ट यांनी समुद्र संशोधनाची सूत्रे हाती घेतली. गेस्ट यांच्या मार्गदर्शनाखाली चार पाणबुड्यांनी १२० चौरस मैलांचा समुद्राचा तळ हुडकायला सुरुवात केली.

प्रथम त्यांना समुद्रात बुडालेला विमानाचा काही भाग सापडला. तो भाग सापडताच डेल्फियाहून मिझार ही पाणबुडी मागविण्यात आली. ह्या बोटीवर पाण्याच्या तळाची छायाचित्रे घेण्याची साधने होती. तसेच तळाचा शोध घेण्यासाठी आवश्यक अशी प्रकाशव्यवस्था पण होती. तळाची जी छायाचित्रे घेण्यात आली त्यामुळे संशोधनाचे क्षेत्र २८ मैलांइतके मर्यादित झाले. या मर्यादित क्षेत्रात १३० ते २०० फुटांपर्यंत आत जाऊन तळाचा ठाव घेण्याचे कार्य सुरू झाले. या ठिकाणी संरक्षणासाठी दोन विध्वंसक बोटी तयार होत्या.

अल्विन व अल्युमिनॉट या दोन पाणबुड्यांच्या अविरत प्रयत्नांनीदेखील रिकामे तेलाचे डबे, बी-५२ विमानाचा एक पंख यांव्यतिरिक्त काहीच हाती लागले नाही. एव्हाना मार्चची १ तारीख येऊन ठेपली होती. अफवांना ऊत आला होता. स्पेनमध्ये अमेरिकाविरोधी अपप्रचाराला धार चढविली जात होती. अखेर अमेरिकेच्या पेन्टॅगॉन या लष्करी संघटनेने एक हैड्रोजन बाँब भूमध्य समुद्रात हरवल्याचे अधिकृतरीत्या जाहीर केले.

१५ मार्चपर्यंत संशयित समुद्रतळाचा पूर्ण भाग पाहून झाला होता. जनरल विल्सनने हैड्रोजन बाँब मिळण्याची आशा सोडून दिली होती. पण याच वेळी व्हॅलेंटाईन ह्या पाणबुड्याला (Diver) 'पाण्यात वरखाली होत असलेले पॅराशूटचे कापड दिसले ! त्याने ताबडतोब पाणबुडीवर तसा संदेश दिला. अल्विन ही पाणबुडी त्याप्रमाणे त्या पॅराशूटच्या जवळ येऊन पोचली. त्या पॅराशूटच्या खाली कदाचित हैड्रोजन बाँब दडला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात आला. अल्विनमध्ये असलेल्या तिघा ऑपरेटर्सनी अल्युमिनॉटला खाली येण्यासाठी संदेश दिला. पण या वेळी अल्युमिनॉटची बॅटरी उतरली होती. ती चार्ज करून बोट पाण्यात जाईपर्यंत सहा तासांचा अवधी उलटला होता. तोवर भाग सुटण्याच्या भीतीमुळे

अल्विन पाण्यातच राहिली होती व इतका वेळ पाण्यात राहिल्यामुळे तिच्यातील ऑपरेटर्स गारठून गेले होते.

पण तशाही स्थितीत अल्विनने आपल्या यांत्रिक हातांनी पॅराशूटवर पकड बसविण्याचा प्रयत्न केला. असे करताना दोन धोके होते. एक, पाणबुडी पॅराशूटच्या दोऱ्यांत अडकून पडण्याचा व दुसरा, प्रत्यक्ष हैड्रोजन बाँबच्या स्फोटाचा ! तेव्हा तो प्रयत्न सोडून देण्यात आला व खुणेसाठी तेथे नांगर टाकून दोन्ही पाणबुड्या बोटी वर आल्या

मधल्या काळात समुद्रातील पाणी ढवळलं जाऊन तळाशी जमलेला क्षारपदार्थ वर आला व त्याचा एक ढगच पाण्यात तयार झाला. त्या ढगामुळे ते पॅराशूटच दिसेनासं झालं ! तो क्षारपदार्थ पुन्हा तळाशी बसेपर्यंत २ एप्रिल ही तारीख उजाडली.

## अल्विन पॅराशूटमध्ये अडकली !

क्षाराचा ढग नाहीसा झाला होता व पॅराशूट दिसायला लागले होते, पण जे दिसत होते ते खूपच अंधुक होते. त्या अंधुक उजेडात काम करण्यासाठी कर्व्हे हे यंत्र उपयोगात आणलं गेलं. अल्विनने पुन्हा पॅराशूटजवळ जाऊन ते वर कसं उचलता येईल याचा अदमास घ्यायला आरंभ केला. विल्सनने आपली पाणबुडी पॅराशूटच्या उंचीच्या खाली नेली व ती पॅराशूटच्या अधिक जवळ सरकली. पण असे करताना जे होऊ नये त्याच्यासाठी आटापिटा केला होता तेच अखेरीस घडले व अल्विन पॅराशूटच्या आवरणात गुरफटली गेली !

विल्सनच्या हे लक्षात येताच त्याने बोट मागे घेण्याचा प्रयत्न केला. पण त्याला मागे पण सरकता येईना. पॅराशूटच्या दोऱ्या बोटीभोवती गुरफटल्या जायचा संभव होता. तसे झाले असते तर अल्विन पाण्यातच अडकून पडली असती. हा अपघात टाळण्यासाठी विल्सनने जवळजवळ पंधरा मिनिटे पराकाष्ठेचे कौशल्य दाखवून पाणबुडीच्या हालचाली केल्या व पॅराशूटच्या उजव्या बाजूला झालेली मोकळी जागा पाहून त्यातून त्याने आपली बोट शिताफीने बाहेर काढली ! अल्विन बाहेर येताच साऱ्यांच्या जिवात जीव आला.

एव्हाना कर्व्हे या यंत्राने पॅराशूटच्या कापडावर आपली पकड बसविली होती. पॅराशूटवर पकड बसवल्यावर कर्व्हेने ते वर उचलायला सुरुवात केली. पॅराशूट उचलले जाताच त्या खाली दडलेला, चकचकीत, सिगारेटच्या आकाराचा हैड्रोजन बाँब पॅराशूटलाच लटकत असलेला दृष्टोत्पत्तीस आला.

अशा रीतीने अपघात झाल्यापासून ७९ दिवस, २२ तास व २३ मिनिटांनी हरवलेला चौथा हैड्रोजन बाँब अमेरिकेच्या ताब्यात आला.

अॅडमिरल गेस्टने लगेच माद्रिद व वॉशिंग्टन येथे संदेश पाठवले, " ही कारवाई पूर्ण झाली आहे ! (This mission is complitea)." ●



# आणि ड्रॅगन जागा झाला

अरुण साधू

# उत्तरार्ध :

## लेखांक दुसरा

मशीनगन्सच्या गोळयांचा पाऊस पडतो आहे, जखमी जनावरावर झेपावणाऱ्या गिधाडाप्रमाणे चँग-कै-शेकची आधुनिक विमाने सतत बाँबवर्षाव करीत डोक्यावर घिरटया घालीत आहेत, कोमिंटांगच्या आणि लष्करी सरदारांच्या सेना ठायी ठायी कोंडीत गाठून प्रहार करीत आहेत, ठिकठिकाणच्या रानटी जमाती अधूनमधून हल्ले करीत लचके तोडीत आहेत, रानटी श्वापदे, निरनिराळे रोग, निबिड अरण्ये एकामागून एक बळी घेत आहेत अशा स्थितीत माओ आणि चुह तेव्हयांच्याबरोबर कियांगसी—हुनान सरहद्दीवरून कोमिन्टांगचे कडे तोडून निघालेल्या सुमारे एक लाख संख्येच्या लाल सैन्याला सुरक्षित स्थान शोधण्यासाठी तब्बल एक वर्षभर वणवण भटकावे लागले. सुमारे सात हजार मैलांच्या पायी प्रवासानंतर हे लोक शेन्सी प्रांतातील येनान या सुरक्षित स्थळी पोचले, तेव्हा मूळच्या एक लाख स्त्री-पुरुषांपैकी फक्त २० हजारच उरले होते ! बाकीच्यांपैकी काही शत्रूच्या गोळयांनबळी पडले, काही थंडीने गारठून गेले, काही हिंस्र श्वापदांच्या भक्ष्यस्थानी पडले, काही उंच उंच कडयांवरून कोसळून ठार झाले, काही भयानक रोगांनी झिजत झिजत मेले तर काही दलदलीच्या प्रदेशांत गाडले गेले. आधुनिक इतिहासातील अत्यंत भयानक आणि प्रचंड वाटचाल म्हणून मानला गेलेला हा ' लाँग मार्च ' नव्या कम्युनिस्ट चीनचे मोठे स्फूर्तिस्थान होऊन बसला आहे.

### विलक्षण अनुभव

या ३६८ दिवसांच्या लोकविलक्षण प्रवासात कम्युनिस्टांना उत्तुंग हिमाच्छादित शिखरांच्या अठरा रांगा, चोवीस मोठाल्या नद्या, अनेक वाळवंटे, कित्येक दलदलीचे प्रदेश आणि घनदाट अरण्ये पार करावी लागली. सतत अर्धपोटी पायपीट करावी लागत होती, तर कित्येक दिवस नुसते जंगली कंदमुळांवर काढावे लागत होते. आपल्या अपुऱ्या शस्त्रानिशी त्यांना रोज एखादी तरी चकमक करावी लागत होती तर साऱ्या वर्षभराच्या प्रवासात त्यांना दोनशे मोठया लढायांना तोंड द्यावे लागले होते.

केवढा हा विलक्षण अनुभव ! या भयंकर कसोटीतून वाचलेले कम्युनिस्ट तावून सुलाखून निघाल्याप्रमाणे अधिकच कर्मठ बनले. सध्याच्या कम्युनिस्ट चीनच्या वरिष्ठ वर्तुळातील बहुतेकजण या ' लाँग मार्च 'च्या भट्टीतून आलेले आहेत.

" माओ-त्से-तुंगचा आणि इतर चिनी पुढाऱ्यांचा मला सगळ्यांत जास्त कशा-बद्दल हेवा वाटत असेल तर त्यांच्या ' लाँग मार्च 'चा." हिंदी-चिनी भाई भाईंच्या काळात स्वर्गीय पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी हे उद्‌गार काढले होते.

नेहरूंना हेवा वाटत होता तो ' लाँग मार्च 'चा नव्हे तर ' लाँग मार्च 'मध्ये चिनी कम्युनिस्टांनी जे एकत्र कष्ट भोगले, यातना सहन केल्या त्यामुळे त्यांच्यामध्ये परस्परांत जी अभेद्य निष्ठा उत्पन्न झाली आणि त्यामुळे चिनी जनतेची त्यांच्यावर जी अनन्य श्रद्धा बसली त्याचा. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आम्ही काय केले हे जनतेला पटवून देण्याची चिनी कम्युनिस्टांना पुढे मुळी गरजच पडली नाही. ' लाँग मार्च ' मुळे त्याची पात्रता आधीच सिद्ध झाली होती. ' लाँग मार्च 'च्या नाटयमय भव्यतेचा, दिव्यतेचा व त्याचा जनतेच्या मनावर आपोआप होणाऱ्या परिणामांचा नेहरूंना हेवा वाटत असला पाहिजे.

वास्तविक पाहता ' लाँग मार्च 'मध्ये हेवा वाटण्यासारखे काही नाही. त्या भयाण प्रवासातून जिवंत राहिलेल्या चिनी कम्युनिस्टांना ते दिवस आठवले म्हणजे अंगावर नक्कीच शहारे येत असले पाहिजेत. ' लाँग मार्च 'ची भयानकताच तशी आहे.

## नेतृत्वाचा संघर्ष

' लाँग मार्च 'च्या नेत्यांना नैसर्गिक आणि शारीरिक लढायांबरोबरच आणखीही एका बाबतीत झगडावे लागत होते. सबंध ' लाँग मार्च 'मध्ये कम्युनिस्टांच्या नेतृत्वा-साठी परोपरीचा संघर्ष या नेत्यांमध्ये चालू होता. राजकीय अस्तित्वासाठी त्यांना आपापसांतील असंख्य संघर्षांना तोंड द्यावे लागत होते. या नेत्यांनाही लाल सैन्यातील इतर साध्या सैनिकांप्रमाणे अर्धपोटी राहावे लागत होते, कडक थंडीत निवाऱ्या-शिवाय झोपावे लागत होते, शत्रूच्या गोळ्यांना आणि अनेक रोगांना तोंड द्यावे लागत होते. त्याचबरोबर आपल्या राजकीय शत्रूंपासूनही त्यांना धोका होण्याचा संभव होता. माओ-त्से-तुंगलाही या ' लाँग मार्च 'मध्ये निकराच्या नेतृत्वस्पर्धेला तोंड द्यावे लागले. आणि ' लाँग मार्च ' संपण्याच्या सुमारास तो लाल सैन्याचा स्वीकृत नेता म्हणून मानला गेला.

' लाँग मार्च' ला सुरुवात झाली तेव्हा या संपूर्ण हालचालींचा एकमेव असा अधिकृत नेता नव्हता. माओबरोबर एक लाख लोक निघाले त्याचप्रमाणे त्याच मार्गातील इतर सोव्हिएटस्‌मधूनही अनेक लाल सेना वेगवेगळ्या नेत्यांबरोबर सुरक्षित आश्रयस्थाने शोधण्यासाठी बाहेर पडल्या होत्या. जनरल हो-लुंग आणि चँग-को-ताओ यांच्या नेतृत्वाखालीही लाल सेना अशाच वाटचाल करीत. शेवटी माओ-त्से-तुंगच्या ' लाँग मार्च'ला महत्त्व प्राप्त झाले. कारण तो शेवटी सुरक्षित ठिकाणी यशस्वीपणे पोचला. परंतु ' लाँग मार्च'ला सुरुवात झाली, तेव्हा कोणती

तुकडी यशस्वी आणि प्रभावी ठरणार हे कळणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांच्यामध्ये आपसांत नेतृत्वासाठी स्पर्धा सुरू होती.

माओच्या तुकडीबरोबर चुह् तेह, चाऊ-एन-लाय, हे दोघे प्रमुख नेते होते. त्याचबरोबर पो-कू आणि ली-तेहसारखे मॉस्कोचे खास शिक्षण घेऊन आलेले विद्यार्थी नेते आणि कोमिन्टार्नशी घनिष्ठ संबंध असलेले नेतेही होते. या सगळ्यांशी माओला झगडावे लागले व शेवटी केवळ स्वतःच्या अंगच्या गुणांवर आणि नशिबामुळे माओ-त्से-तुंग व चुह्-तेह् हे या ' लाँग मार्च 'चे सर्वमान्य नेते झाले.

## चँगची फळी

ऑक्टोबर १९३४ मध्ये कियांगसी सोव्हिएटला पडलेला वेढा फोडून माओ व चुह्चे लाल सैन्य दक्षिणेत क्वांगटुंग प्रांतात उतरले. तेथून ते क्वांगसी, हुनान प्रांतातून क्वेचोव प्रांतात पोचले. तोवर त्यांमधील एक तृतीयांश स्त्री-पुरुष गारद झाले होते. सुरुवातीला लाल सेनेचा प्रवास अगदी न चुकता वायव्येच्या दिशेने चालू होता. त्यामुळे चँग-कै-शेकच्या सैन्याला त्यांच्या मार्गात अडथळे आणून त्यांच्यावर बाँबिंग करणे सोपे जात होते. पण झालेली हानी घ्यानात येऊन पुढे लाल सेनेने नवीनच पवित्रा घेतला. साऱ्या सैन्याची हालचाल एकाच सरळ दिशेने न करता तीन-तीन चार-चार तुकड्या वेगवेगळ्या दिशांनी पांगून त्या पुढे एका ठिकाणी मिळत व अशा रीतीने सैन्याची हालचाल चालू असे. त्यामुळे लाल सैन्याची नेमकी हालचाल कोणत्या दिशेने चालली आहे ते शत्रू सैन्याला कळणे अवघड जात असे. अवजड सामान टाकून देऊन अत्यावश्यक तेच सामान बरोबर घेऊन या तुकड्या रात्री प्रवास करीत आणि दिवसा घनदाट जंगलांमध्ये मुक्काम ठोकीत. त्यामुळे विमानातून त्यांच्यावर बाँबफेक करणेही अवघड होऊ लागले.

उत्तरेच्या दिशेने क्वेचोव प्रांत ओलांडला की स्झेचुआन प्रांतात थोड्याच अंतरावर चीनची प्रचंड नदी यांगत्से लागते. खेड्या-खेड्यांमधून प्रचारसभा घेत, शत्रू सैन्याला हुलकावण्या देत ठिकठिकाणी नवीन सैनिक भरती करीत लाल सेनेचा प्रवास उत्तर दिशेनेच चालू होता. लाल सैन्य आता यांगत्से नदी पार करण्याचा नक्कीच प्रयत्न करणार असा अंदाज करून चँग-कै-शेकने हुपेह, अनहुई, कियांगसी प्रांतातून हजारो सैनिक गोळा करून यांगत्से नदीतून बोटीमधून स्झेचुआनमध्ये आणले आणि नदीच्या उत्तरेला मोठी फळी उभी केली. नदी पार करण्याला योग्य अशा ज्या ज्या जागा असतील तिथे तिथ त्याने मोठी सैन्ये आणून ठेवली. क्वेचोव प्रांतातील लष्करी सरदाराच्या मदतीसाठी हजारो सैनिक पाठविले. क्वेचोव प्रांताच्या मध्यापर्यंत लाल सैन्य पोचले तेव्हा त्यांच्या चारी बाजूंनी सुमारे दोन लाख शत्रू सैनिकांचा घेरा होता.

कम्युनिस्टांना कायमचे नेस्तनाबूद करण्याची चँगला पुन्हा संधी आली होती.

यांगत्से नदी पार करण्याचा कुठेही लाल सैन्याने प्रयत्न केला तर त्याचा पार घुव्वा उडेल, असा बंदोबस्त चँगने कुशलतेने करून ठेवला होता. दक्षिणेत युनान प्रांतातून तिबेटच्या वाळवंटात जाण्याचा एकच मार्ग लाल सैन्याला शिल्लक होता आणि एकदा का कम्युनिस्टांना तिबेटमध्ये हाकलून लावले की त्यांची कटकट कायमची चुकेल असे चँगला वाटत होते.

## मोर्चा वळवला

परंतु लाल सैन्याची वाटचाल अद्यापही उत्तरेच्या दिशेने चालू होती. वाटेत त्यांनी शत्रू सैन्यालाही बरेच जेरीस आणले होते. क्वेचोव प्रांताच्या अगदी उत्तर टोकापर्यंत पोचल्याबरोबर एकाएकी लाल सैन्याने दक्षिणेकडे मोर्चा वळवला. आणि काय होते आहे हे कळण्याच्या आत त्यांनी चार दिवसांत वेगाने मजल दरमजल करीत सारा क्वेचोव प्रांत पुन्हा पायाखाली तुडवून युनान प्रांतात प्रवेश केला आणि युनानची राजधानी युनानफू या शहरापासून अवघ्या दहा मैलांवर लाल सैनिक येऊन ठेपले.

युनानफू शहरात एकच घबराट उडाली. त्याच वेळेस चँग आणि त्याची बायको युनानफूमध्येच होती. युनान प्रांताच्या दक्षिणेलाच उत्तर व्हिएटनामची सीमा लागते. युनान प्रांत आणि व्हिएटनाम यांना जोडणारा एक रेल्वेमार्ग त्या वेळी होता. तो नादुरुस्त होता. चँगने तावडतोब घाईघाईने हा मार्ग दुरुस्त करण्याच्या आज्ञा दिल्या. कोमिन्टांगची बाँबर विमाने लाल सैन्यावर बाँबवर्षाव रोज करीतच होती तरी लाल सैन्याची युनानफूच्या दिशेने प्रगती चालूच होती.

शेवटी कळून चुकले की ही लाल सैन्याची हुलकावणी होती. एक-दोन लहान लाल तुकड्या तेवढ्या या हुलकावणीसाठी यूनानफूपर्यंत आल्या होत्या. खरे लाल सैन्य केव्हाच पुन्हा युनानमधून वायव्येला वळून यांगत्से नदीच्या दिशेने निघाले होते. युनान प्रांतात लेंकाई या एकाच ठिकाणाहून यांगत्से नदी लाल सैन्याला पार करणे शक्य होते. आणि त्याच दिशेने लाल सैन्य चालले होते.

एकीकडून तिबेट व दुसरीकडून ब्रह्मदेश व इंडोचीन यांच्या खबदाडीत असलेला युनान प्रांत अतिशय डोंगराळ आहे. उंच उंच भयानक अशा उभ्या कड्यांच्या रांगांमधून युनान प्रांतात यांगत्से नदी खोलवर वेगाने खळखळ वाहत जाते. काही ठिकाणी तर या कड्यांचे सुळके नदीपात्रापासून एकदम मैलभर वर उभे चढले आहेत. फारच थोड्या जागा अशा आहेत की जेथे नदी पार करता येईल. आणि त्या सर्व जागी कोमिटांग सैन्य जय्यत तयारीने उभे होते. लाल सैन्य नदी पार करण्याच्या उद्देशाने वर सरकत आहे हे बघून चँग-कै-शेक खूष झाला. नदीवर असणाऱ्या सगळ्या बोटी उत्तर किनाऱ्यावर नेऊन जाळून टाकाव्यात असे हुकूम सोडून चँग स्वत: आपले सैन्य गोळा करून लाल सैन्याला कोंडीत पकडण्याच्या

हालचाली करू लागला. यांगत्से नदीकाठीच लाल सैन्याची आता राखरांगोळी करायची या जिद्दीने तो सरकू लागला. कम्युनिस्टांचे भविष्य आता त्याच्या दृष्टीने संपले होते.

## यांगत्से पार केली

इकडे लाल सेना जणू अजाणतेपणाने यांगत्से नदीवरील लेंकाईच्या रोखाने भराभर मार्ग आक्रमीत होत्या. तेथील बोटींनी आणि आघाडीच्या लाल पथकांनी तेथे एक बांबूचा पूल बांधण्याचे जिकिरीचे काम सुरू केले. चँगच्या टेहेळणी विमानांनी ही बातमी आणली, तेव्हा तो दुप्पट वेगाने लाल सैन्याच्या पाठीवर निघाला. बांबूचा पूल तयार व्हायला कैक आठवडे लागले असते.

परंतु एका रात्री एका लाल पथकाने एकदम आपली दिशा बदलली. लपत छपत मोठ्या धाडसाने आणि वेगाने त्यांनी एक दिवस आणि एका रात्रीत सुमारे पंचाऐंशी मैल अंतर कापले. लेंकाईच्या पश्चिमेला चाटुंपिंग या एका किल्ल्याच्या ठिकाणीच यांगत्से नदी पार करण्याची एकुलती एक जागा होती. दुसरे दिवशी दुपारी ही तुकडी या किल्ल्यापाशी पोचली. तुकडीच्या अंगावर युद्धात जिंकलेले कोमिटांग सैनिकांचे गणवेष होते. संध्याकाळी ही तुकडी अगदी सहजगत्या किल्ल्यात शिरली आणि त्यांनी तेथल्या कोमिटांग शिपायांना बेसावध पकडून निःशस्त्र केले.

साऱ्या बोटी उत्तर किनाऱ्यावर होत्या. पण चँगच्या आज्ञेप्रमाणे त्या जाळल्या मात्र गेल्या नव्हत्या. लाल सैन्य तेथून शेकडो मैल दूर होते. ते इकडे येण्याचे लक्षण दिसत नव्हते. मग उगाच बोटींचा नाश कशाला करा, असा विचार करून तेथील कोमिन्टांग सैनिकांनी बोटी जाळण्याचे टाळले होते. त्यांनी चँगच्या आज्ञा नीट पाळल्या असत्या तर मात्र लाल सैन्याची शंभर वर्षे भरलीच असती.

आता फक्त या बोटी दक्षिण किनाऱ्यावर आणण्याचाच प्रश्न होता. रात्री लाल सैनिकांनी किल्ल्यातील एका अधिकाऱ्याला किनाऱ्यावर नेले आणि सरकारी सैनिकांसाठी एक बोट इकडे पाठवा असे ओरडून पलीकडच्या किनाऱ्यावरील सैनिकांना त्याने सांगितले. कुणाला संशय येण्याचा प्रश्नच नव्हता. कारण सरकारी सैन्याच्या माहितीप्रमाणे लाल सैन्य तेथून कमीत कमी तीन दिवसांच्या चालीच्या अंतरावर होते. एक बोट दक्षिण किनाऱ्यावर पाठविण्यात आली. कोमिन्टांगचा गणवेष घातलेले लाल सैनिक तीमध्ये बसले आणि थोड्याच वेळात उत्तर किनाऱ्यावर स्झेचुआन प्रांतात उतरले. तेथील सैनिकांची छोटीशी तुकडी आपली शस्त्रे भिंतीला टेकवून ठेवून पत्ते कुटण्यात दंग झाली होती. लाल सैनिकांनी त्यांच्यावर संगिनी रोखून त्यांना जेव्हा हात वर करायला सांगितले, तेव्हा त्यांना ही थट्टा आहे की काय आहे हे कळेना.

दरम्यान मुख्य लाल सेनेनेही आपली दिशा बदलून या किल्ल्याच्या दिशेने

वाटचाल सुरू केली. दुसऱ्या दिवशीच्या दुपारपर्यंत आघाडीची पथके तेथपर्यंत येऊनही पोचली. नदी पार करणे ही आता सोपी गोष्ट होती. सहा मोठ्या बोटी त्या ठिकाणी होत्या. तब्बल नऊ दिवस त्या बोटी सतत ये-जा करीत लाल सैन्याचे लोंढेच्या लोंढे नदीपार नेत होत्या. एकही बळी न जाता सारे लाल सैन्य नऊ दिवसांत नदीपार झाले. नंतर मात्र लाल सैन्याने त्या बोटी चटकन जाळून टाकल्या आणि दिवसभर पलीकडच्या तीरावर त्यांनी मस्त विश्रांती घेतली.

दोन दिवसांनंतर चँगचे सैन्य दक्षिण तीरावर आले, तेव्हा पिछाडीच्या लाल तुकड्या आपले सामान आवरीत होत्या. पलीकडच्या तीरावरील शत्रुसैन्य पाहताच त्यांनी मोठमोठ्याने हसत ओरडून त्यांना टाटा केले आणि त्या पुढे चालू लागल्या.

दक्षिण तीरावरील कोमिन्टांग सैन्याला दातओठ खाण्याखरीज गत्यंतर नव्हते. नदी पार करायला त्यांच्याजवळ बोटी कुठे होत्या ? नदी पार करण्यासाठी त्यांना पुन्हा ऐंशी मैलांचा वळसा घ्यावा लागला. कम्युनिस्टांचा पाठलाग तात्पुरता तरी थांबला होता.

## " इतिहासाची पुनरावृत्ती झाली पाहिजे .... "

पण इकडे चँग-कै-शेकचा जळफळाट झाला होता. ताबडतोब तो विमानाने स्झेचुआन प्रांतात उतरला आणि पुढे सरकणाऱ्या लाल सैन्याला पुन्हा मध्ये कुठे तरी कोंडीत पकडून कापून काढण्याचे मार्ग शोधू लागला. स्झेचुआनमध्ये लष्कर गोळा करू लागला.

आणि तशी संधी त्याला पुन्हा चालून आली. लाल सैन्याने यांगत्से नदी पार केली होती खरी, पण पुढे पार करायला अधिकच कठीण असलेली तातू नदी होती आणि लाल सेना याच नदीच्या रोखाने मार्ग आक्रमीत होत्या. चँग आता या वेळी मुळीच चूक करणार नव्हता. आपले सारे सामर्थ्य आणि कौशल्य पणाला लावून तो या नदीकाठी कम्युनिस्टांचे पूर्ण शिरकाण करण्याची जोरात तयारी करू लागला होता.

लाल सैन्याचीही ही अत्यंत आणीबाणीची वेळ होती. यांगत्से नदी पार करण्याच्या वेळी लाल सेनला हालचाली करायला भरपूर वाव होता. इथे तसे नव्हते. तातू नदी वेगाने पार करता आली नाही तर आपले संपूर्ण शिरकाण होऊन नामोनिशाणीही उरणार नाही, याची सेनेला खात्री होती. तातू नदीने इतिहास काळातही अनेक बंडखोरांचे बळी घेतली होते. एकोणिसाव्या शतकातील मांचू राजाविरोधी सुप्रसिद्ध तैपिंग क्रांतिकारकांचे बंड याच तातू नदीच्या किनारी मोडले गेले होते.

तैपिंग बंडखोरांत आणि कम्युनिस्ट लाल सेनेत कमालीचे साम्य होते. किंबहुना चिनी कम्युनिस्टांनी मार्क्सवादापेक्षा तैपिंग क्रांतिकारकांकडूनच अधिक गोष्टी उचलल्या असाव्यात, असेच दिसते. तैपिंग बंडखोरांचा नेता शिह-ता-कै हा एका

सामान्य शेतकऱ्याच्या घरात जन्मला होता. जुलमी राज्यसत्तेविरुद्ध झगडण्यासाठी त्याने आपल्याभोवती शेतकऱ्यांच्या प्रचंड सेना जमा करून मध्य चीनमध्ये एक सामर्थ्यशाली प्रतिराज्य स्थापन केले होते. तैपिंग क्रांतिकारकांच्या सैन्यातील शिस्त, समता, त्यांच्या घोषणा, शेतकऱ्यांविषयीची सहानुभूती, जमीनदारांविषयीचा आकस, सैनिकांच्या वागणुकीचे नियम—सारे जसेच्या तसे कम्युनिस्टांनी उचलले होते.

पुढे अंतर्गत भ्रष्टाचारामुळे तैपिंग सत्ता कोसळू लागली होती. १८४८ च्या सुमारास तैपिंग नेता शिह्–ता–कै आपल्या एक लाख बंडखोर सैन्यासह मांचू सैन्याचा पाठलाग चुकवीत असता तातू नदीच्या तीरी नदी ओलांडण्याच्या उद्देशाने आला. या नदीतीरीच मांचू सैन्याने या बंडखोर सैन्याला घेरले आणि त्यांचे अक्षरश: संपूर्ण शिरकाण केले. आणि तैपिंग क्रांतिकारकांचे बंड संपूर्ण कोलमडले.

आता बंडखोर लाल सैन्य याच ऐतिहासिक तातू नदीच्या रोखाने वेगाने वाटचाल करीत होते. स्झेचुआनमध्ये चँग–कै–शेकच्या बाजूचे दोन सरंजाम सरदार आणि कोमिन्टांग यांचे सैन्य सर्वत्र विखुरले होते. लाल सैन्य तातू नदीच्या रोखाने जात आहे हे पाहताच चँगने आपल्या सेनापतींना तातडीने संदेश धाडले – "लाल सैन्याला कोंडीत गाठा—तैपिंग इतिहासाची पुनरावृत्ती झाली पाहिजे–"

लाल सैन्याचा काळ जवळ आला होता. [ अपूर्ण ]


# माणूस

साप्ताहिकासाठी खालील गावी विक्रेते नेमणे आहेत.
चौकशी करावी.

**जिल्हा रत्नागिरी**

**१. सावंतवाडी**

**जिल्हा सांगली**

**१. जत २. शिराळा**

**जिल्हा सोलापूर**

**१. सांगोला २. अक्कलकोट ३. मंगळवेढा**

**४. माढा ५. करमाळा**

## पुस्तके

# सूर्यफूल

आकाराने लहानशी असलेली ही कादंबरी तिच्यातील उत्कटतेमुळे अतिशय परिणामकारक झाली आहे. हृदयस्पर्शी ठरली आहे.

पोलिओने पांगळचा झालेल्या एका निष्पाप मुलाचे दु:ख हा या कादंबरीचा गाभा. या मुलाचे–विशूचे–वडील त्याच्या बालपणीच वारलेले आहेत. नातवासाठी कासावीस होणारे आजोबा आणि शाळेत नोकरी करून संसार चालविणारी विधवा तरुण आई हे कुटुंबातले उरलेले घटक. ज्याच्याकडून आधाराची अपेक्षा करावी तो विशूच लोळागोळा होऊन पडल्याने त्याची आई त्याचा रागराग करते, तारुण्याच्या आवाहनाकडे दुर्लक्ष करता न आल्यामुळे देसाई मास्तरांकडे आकर्षित होते. त्यांच्याशी पुनर्विवाह करते आणि विशूच्या दु:खाला वेगळीच चौकट लाभते. जगण्यासारखे काहीच नसताना नातवासाठी दिवस काढणारे आजोबा आणि मायेने जीव लावणारी शेजारची सुमी एवढी दोनच विशूच्या विरंगुळचाची ठिकाणे. सुमीच्या आग्रहाखातर चित्रस्पर्धेसाठी तो चित्र काढतो आणि त्याला पहिल्या क्रमांकाचे सुवर्णपदक मिळते. सुखाची लहानशी झुळूक येते, पण याच वेळी आजोबांना अपघाती मरण आल्याने ती करपून जाते. विशूचे चैतन्य हारपते. भकासपणा त्याचे

# उत्कटतेने भारावलेली कादंबरी

जीवन व्यापून टाकतो. काही दिवसांनी सुधा धनवटे या चित्रकर्तीच्या रूपाने त्याचे हरवलेले दैव त्याला शोधीत येते, आणि त्याच्या निराश जीवनाला दिशा सापडते. तिच्या स्टुडिओत विशूची प्रतिभा फुलू लागते. सुमीविषयीच्या आपल्या भावनांची ओळख याच सुमारास त्याला होते; पण त्या भावनांचे मूर्त रूप घडणे अशक्य असते. तेवढ्यात सुमीचे लग्न सोन्यावरून मोडत असल्याचे त्याच्या कानी येते आणि आपले पाच तोळ्यांचे सुवर्णपदक सुमीच्या वडिलांना तो देऊन टाकतो. सुमी सुखी होण्यासाठी.

विशूच्या अगतिक मनाची व्याकुळता हा कादंबरीचा कणा आहे. या दुःखाला अनेक कंगोरे आहेत. पोलिओमुळे हरवलेल्या चैतन्याचे दुःख, आईच्या तुटक वागण्याचे दुःख, आपल्यापेक्षा परक्या देसाई मास्तरांना तिने जवळ करावे याबद्दलची चीड, लोकांच्या सहानुभूतीमुळे वाटणारा अपमान, आजोबांच्या अचानक मृत्यूमुळे बसलेला धक्का, सुमीबद्दलच्या नाजूक भावनांची विफलता या साऱ्यांचा एकत्रित परिणाम होऊन त्याचे व्यक्तित्व तयार होते. त्याला विलक्षण धार येते. पाल्हाळिकपणाने दुःखाचे ठरीव दळण दळत न बसता त्याचा विविध दृष्टिकोनांतून सहृदयतेने विचार करून लेखकाने त्याला अधिक बोलके केले आहे. ही करुण रसाची 'निर्मिती' नाही. खरेखुरे कारुण्य येथे पानापानांतून पाझरले आहे. प्रसंगांतून, हालचालींतून, बोलण्यांतून वाहवले आहे. केवळ 'पांगळा दुःखी प्राणी' एवढेच विशूचे प्रातिनिधिक स्वरूप नाही. त्याला त्याचे स्वतःचे अस्तित्व आहे. त्याच्या मनात बरे होण्याची आशा आहे, आजोबांविषयी प्रेम आहे, देसाई मास्तरांविषयी तिरस्कार आहे. परिस्थिती जाणून घेण्याचा समजूतदारपणा आहे. कदाचित यामुळेच त्याच्या असहाय कारुण्याला उठाव मिळत असावा.

किंबहुना कादंबरीतील सर्वच व्यक्तिरेखा जिवंत आणि गतिमान साकारण्यात कर्णिक यशस्वी झाले आहेत. इंदू, आजोबा, देसाई, सुमी – सारे सचेतन आहेत. घडीव नाहीत. प्रत्येकाला स्वतःची बाजू आहे आणि ती अपरिहार्य आहे. "तुला वाटत असेल, मी तुझा द्वेष करते... तिरस्कार करते... पण तसंही नाही रे– कसं सांगू तुला ? मला नाही राहता येत असं– नाही राहता येणार !" ही इंदूची परिस्थिती आहे. दुर्बल असली तरी स्वाभाविक आहे. परिस्थितिजन्य आहे. "सूनबाई, अग कसलं हे तुझं आतडं ? कशी अशी निष्ठुर तू ? पोटचा गोळा अपंग होऊन

पडला नि साधी हालचालसुद्धा त्याला महाग झाली, याची कशी पोटतिडीक नाही तुला ? कसं वैर धरलं आहेस तू त्या गरीब मुलाशी ? का म्हणून ? आपल्या कुटुंबावर अशी संकटे आली हा काय त्याचा दोष ?" हे आबांचे तळतळून काढणारे विचारही स्वाभाविकच दोन्हींच्या संघर्षातून एक चमत्कारिक गुंफण बनत जाते. तिचा पीळ सर्वांनाच असह्य होतो. वाचकाला हुरहूर लावतो.

## विशूची बोलकी दुःखे

श्री. कर्णिक भावनेच्या प्रवाहात वाहत जात नाहीत. उलट रेखीवपणे, नीटसपणे भावाकृती निर्माण करण्याचे सामर्थ्य त्यांच्या शैलीत आहे. "या दीड वर्षाच्या अवधीत पिंजऱ्यातला पोपट बोलायला शिकला. कुंडीतल्या गुलाबाला कितीदा तरी बहर आला नि गेला. वळचणीच्या चिमणीने गॅलरीतल्या प्रत्येक कोपऱ्यात आपल्या बिऱ्हाडाची जागा बदलली. पण विशूची जागा बदलली नव्हती," अशा साध्या पण नेमक्या वर्णनाच्या साहाय्याने ते भावनेचे रंग सहजतेने गहिरे करतात. "माणसांना पोलिओ होतो, तसा झाडांना झाला तर ? या कुंडीतल्या गुलाबाला तर पोलिओ होणार नाही ?" असे विचार विशूच्या मनाला शहारे आणतात आणि वातावरणाची व्याकुळता वाढवितात. तसे पाहिले, तर कादंबरीचे कथानक फारसे विस्ताराचे नाही. पण यातच खोल डोह याणि विलक्षण भोवरे निर्माण करून कर्णिकांनी त्याला गतिमानता आणली आहे. ते सतत घुसळत ठेवले आहे. कादंबरीचा प्रवास दिशापूर्वक घडतच नाही, तर तिच्यात एका उसळत्या प्रवाहामुळे सुघड आकृतिबंध तयार होतो. आणि शेवटी आपल्याला जाणवते की ही आकृती घडत असताना विशूच्या व्यक्तित्वाचा खूपच प्रवास झालेला आहे. विकास घडलेला आहे. त्याच्या मनाचे सूर्यफूल चांगले उमलले आहे. पोलिओमुळे पांगळा होऊन


लाल महाल प्रतापगड पन्हाळगड
राजगड पुरंदर आग्रा
मुजऱ्याचे मानकरी

लेखक : ब. मो. पुरंदरे : मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण पेठ, पुणे २

मनातल्या मनात कुढत बसणारा विशू, आईच्या तुटकपणामुळ दुःखी होणारा विशू आजोबांना खुर्ची आणता आली नाही, म्हणून समजूतदार प्रौढपणाने उलट त्यांचीच समजूत घालणारा विशू, संताप अनावर होऊन देसाई मास्तरांवर प्रहार करणारा विशू, चित्रकलेच्या संगतीत दुःख हरवून टाकणारा विशू, राष्ट्रीय कीर्तीचा लाभ झालेला विशू आणि शेवटी सुजाण त्यागभावनेनें सुमीच्या सुखासाठी सुवर्णपदक देऊन टाकणारा विशू ! विशूची ही अनेक रूपे त्याच्या दुःखाला बोलके करतातच, पण शिवाय कादंबरीच्या आकृतीवर क्रमाक्रमाने वळसे चढवत जातात. त्या त्या संदर्भात इतरांच्या मानसिक घडामोडींशी संपर्क साधतात. विशू आणि त्याची आई, विशू आणि आजोबा, विशू आणि सुमी अशा विविध संमिश्र भावनांनी साधलेल्या जोड्या निर्माण करतात. या जोड्यांचा प्रवास कादंबरीच्या सुरुवातीपासून समांतर चालतो. विशूच्या आईचा पुर्नविवाह, आजोबांचा मृत्यू आणि सुमीचे लग्न ठरणे या घटनांनी त्यांच्या संघर्षाचे टोक गाठले जाते. आणि शेवटच्या सूर्यफुलाच्या दाना-मध्ये तिन्हींची स्वाभाविक नि उत्कट परिणती होते.

"आशेची एक हिरवीगार डहाळी त्याच्या वैराण मनात हलून गेली. आणि त्या डहाळीवर बसलेले शुभ्र यशाचे एक गोजिरवाणे पाखरू... लाल माणकांच्या डोळ्यांचे, सोनेरी पंखांचे..." किंवा "आपल्या आईचे पांढरे कपाळच अधिक सुंदर दिसत होते, असे त्याला वाटून गेले" यांसारखी सूचक वाक्ये अथवा वणव्यात भेदरलेल्या हरणाचे चित्र विशूने काढणे, आजोबांचे चित्र वाऱ्याने उडून विशूच्या अंगाखाली सापडणे यांसारखी प्रतीके कादंबरीची खोली वाढविण्यास मदत करतात वाचकांच्या विचारशक्तीला ताण देणारी प्रतीके श्री. कर्णिक वापरत नाहीत. त्यांची प्रतीकें उथळ नसली तरी सोपी आहेत. सहज ओघात आलेली आहेत. "मरणाकडे जगणे खुरडत सरकू लागले,"... "ती नेहमीचे हसली. विशू ते हास्य मनात जपत राहिला. जणू नव्यानेच भेटलेलं एक मधुर हास्य..". यांसारखी वाक्ये इष्ट तो परिणाम अचूक साधून जातात.

अशी ही कादंबरी आकाराने छोटी, पण मनात ठसणारी. उत्कटतेने भारावून गेलेली आणि भारावून टाकणारी. मधु मंगेश कर्णिकांच्या यशोगामी लेखनप्रवासा-तला हा एक सुरेख टप्पा.

—निशिकांत मिरजकर

●

**[ 'सूर्यफूल'– मधु मंगेश कर्णिक : मॅजेस्टिक बुक स्टॉल : मूल्य ४ रुपये : पृष्ठे : ११३ ]**




ॲड. माधव कानिटकर

लेखांक – दुसरा

*आडदांड कर्तारसिंग ग्रामपंचायतीचा सरपंच होता. पण १९५३ च्या जूनमध्ये हरजितसिंगाने निवडणुकीत त्याचा सपशेल पराभव केला आणि निवडून आल्यावर त्याने कर्तारसिंगावर हजारो रुपयांची अफरातफर केल्याचा आरोप केला. सत्तेसाठी सोकावलेल्या पराजित कर्तारसिंगाचा स्वतःवरचा ताबा सुटला. हरजितसिंगाला जगातून नाहीसा करण्याचा बेत ठरला. त्याचा एकनिष्ठ चेला करमसिंग त्याने 'हे' कार्य पार पाडण्याची शपथ घेतली कर्तारसिंगाच्या पायाला हात लावून....*

# व्यक्तिगत द्वेषापोटी दिवसा ढवळ्या खून पाडणाऱ्या बुद्धिमान गुन्हेगाराची सत्यकथा

६ एप्रिल १९५४! दुपारी एक-दीडच्या सुमारास गावकऱ्यांना आश्चर्याचा धक्का बसला. कर्तारसिंग आणि करमसिंग गाव सोडून चालले होते! दोघेही रेल्वे स्टेशनच्या दिशेने शांतपणे चालले होते. बुकिंग ऑफिसपुढे उभ्या असलेल्या कर्तारसिंगाला एका गावकऱ्याने भीतभीतच सलाम केला. कर्तारसिंगाने आग्ऱ्याची थर्ड क्लासची दोन तिकिटे काढली. स्टेशनवर उगाचच रेंगाळणाऱ्या दुसऱ्या एका ग्रामस्थाने त्यांना लुधियानाला जाणाऱ्या गाडीत बसताना पाहिले. आग्ऱ्याला जाण्यासाठी थेट गाडीची सोय नव्हती. प्रथम लुधियानाला जाऊन नंतर गाडी बदलावी लागणार होती.

गावातल्या लोकांनी समाधानाचे सुस्कारे टाकले. कर्तारसिंग आणि करमसिंग दोघेही गाव सोडून गेले! आता अचानक कुणाच्यातरी घराला 'आपोआप' आग लागण्याची शक्यता नव्हती! लूटमार, मारामाऱ्या यांची धास्ती नव्हती. काही लोकांच्या मनात मात्र संशयाची पाल चुकचुकली!

भारत आणि पाकिस्तान यांच्या सरहद्दीवर वसलेले मोघा हे गाव पंजाबमध्ये दोन गोष्टींसाठी प्रसिद्ध आहे. तिथे असलेले डॉ. दास यांचे डोळ्यांचे हॉस्पिटल आणि गावाच्या आजूबाजूला भटकणाऱ्या जाट लोकांच्या टोळ्या! १९४७ मध्ये देशाचे दोन तुकडे झाले आणि फिरोजपूरच्या दिशेने हिन्दुस्थानात आलेल्या हजारो निर्वासितांनी मोघा गावच्या विविध भागांत वास्तव्य केले. कायदा आणि सुव्यवस्था यांना आधीच मोघामध्ये कधी फारशी किंमत नव्हती. त्यात आणखी संपन्न निर्वासितांची भर! चोऱ्या, दरोडेखोरी यांना ऊत आला. संध्याकाळपर्यंत घरात असलेली आपली खूबसूरत तरुण मुलगी रात्री घरी राहीलच अशी शाश्वती कुठल्याही बापाला नव्हती. एकट्या मोघामध्ये जितके खून दररोज होत होते त्याच्या पाव हिस्सादेखील खून भारतात इतरत्र कोठेही होत नव्हते! सरकार या परिस्थितीला काबूत आणण्याचा प्रयत्न करीत होते. खुद्द मोघा गावात अनेक रेसिडेंट मॅजिस्ट्रेटस्‌ची नेमणूक केली होती. राज्यातील पोलिसांना मदत म्हणून खास सुसज्ज व सशस्त्र अशा राखीव पोलीस दलाचा सक्त पहारा होता. पंजाबचा कानाकोपरा

ठाऊक असलेल्या हुशार पोलिस अधिकाऱ्यांची मुद्दाम सरहद्दीवरच्या पोलिस ठाण्यांवर बदली करण्यात आली होती.

संध्याकाळचे सात-साडेसात झाले असतील. नुकतेच ड्यूटीवर आलेले इन्सपेक्टर हझारासिंग आपल्या टेबलावरील कागदपत्र चाळीत होते. समोरच्या भिंतीवरच्या कॅलेंडरवरील आठ एप्रिल १९५४ ही तारीख त्यांनी आल्यापासून दुसऱ्यांदा पाहिली होती. डाव्या बाजूच्या भिंतीवरच्या घड्याळांत त्यांनी ७ वाजून ४० मिनिटे झाल्याचे पाहिले. जीपमधून गावात एक चक्कर टाकून यायला हवे होते ! पोलिसांची गाडी नुसतीच फिरवली तरी फार मोठे काम होत असे ! टेबलावरील कागदपत्र आल्यावर सावकाशपणे पाहूया अशा विचाराने त्यांनी ते एकत्र करून टेबलाच्या उजव्या कोपऱ्याला व्यवस्थित ठेवले. मध्येच आत येऊन 'खडी ताजीम' दिलेल्या हवालदाराकडे पाहून वरिष्ठ अधिकाऱ्याला शोभेल अशा रुबाबात त्यांनी सलामी स्वीकारल्याच्या अर्थाची मान हलवली; आणि बाहेरच्या व्हरांड्यात जाण्यासाठी म्हणून ते दरवाज्याकडे वळले, आणि त्याच वेळी त्यांच्या टेबलाच्या डाव्या हाताला असलेल्या टेलिफोनची घंटा वाजली.

"टिर्र र्रऽऽ रिंग; टिर्र र्रऽऽऽ रिंग"

तात्परतेने मागे वळून इन्स्पे. हझारासिंगांनी रिसिव्हर उचलला आणि कानाला लावता लावता नेहमीच्या सवयीप्रमाणे म्हटले, "मोघा पोलिस स्टेशन प्लीजऽ! इन्स्पे. हझारासिंग हियर !"

"......!"

"हॅलोऽऽऽ? मोघा पोलिस स्टेशन प्लीज......?"

या वेळी मात्र कोणातरी पुरुषाचा घाबरट आवाज त्यांना ऐकू येऊ लागला !

"हरजितसिंग...सरपंच...आणि गज्जनसिंग...दोघांचा खून झालाय...सिंघावाला खेड्यात..."

एखाद्या निष्णात शिक्षकाने निर्बुद्ध विद्यार्थ्याला तीच तीच गोष्ट तशाच तऱ्हेने पुन्हा पुन्हा सांगावी त्याप्रमाणे फोनवरून बोलणारी अज्ञात व्यक्ती पुन्हा पुन्हा सांगत होती.

"हरजितसिंग...सरपंच... सिंघावाला खेड्यात."

"हॅलो ? पण तुम्ही कोण बोलत आहात ? कुठून बोलता आहात ?"

"टिंगऽऽऽ!"

अज्ञात व्यक्तीने टेलिफोन डिस्कनेक्ट केल्याचे इन्स्पे. हझारासिंगांनी जाणले. आपल्या खुर्चीवर बसून ते पाठीवर रेलले. दोन्ही हातांचे पंजे एकमेकात अडकवून, पायाच्या रेट्याने खुर्चीला झोके देत देत असताना ते विचारात पडले. अशा अज्ञात व्यक्तीकडून आलेले असे टेलिफोन कधी कधी खोटेही असतात ! निष्कारण धावपळ होते, कष्ट फुकट जातात. पण नेमका हाच टेलिफोन खरा ठरला तर? उगाच

नको. प्रत्यक्ष जाऊन परिस्थिती पाहून यायला काय हरकत आहे, असा निर्णय घेऊन त्यांनी झटकन् खुर्ची सोडली. इन्फर्मेशन किती वाजता आली ते टेबलडायरीवर टिपून ठेवले आणि ते भराभर हुकूम सोडू लागले. एक सब इन्स्पेक्टर व निवडक पोलिसांची एक तुकडी यांना त्यांनी तय्यार राहण्याचा आदेश दिला. राखीव पोलिस दलाला सुमारे अर्ध्या तासाने सिंघावाला खेड्याकडे मागोमाग येण्याची समज दिली. इन्स्पे. हझारासिंग हे अनेक वर्षे पोलिस खात्यात होते. दरोडेखोरांशी सामना कसा द्यायचा याचे त्यांना अचूक ज्ञान होते. कधी कधी दरोडेखोरांच्या दोन टोळ्या तात्पुरत्या एकत्र येऊन पुढे आलेल्या पोलिस तुकडीवर एकदम गोळीबार सुरू करतात ! किती पोलिस येताहेत याची त्यांना बिनचूक खबर जाते. मागाहून दुसरी पोलिस तुकडी येत आहे, अशी खबर त्यांना अगोदरच गेल्यास सहसा पहिल्या तुकडीला इजा पोचत नाही हे त्यांना ठाऊक होते ! मोघापासून सुमारे ५ मैल दूर असलेल्या सिंघावाला खेड्याच्या दिशेने एका सब-इन्स्पेक्टरसह पहिली पोलिस तुकडी घेऊन इन्स्पे. हझारासिंगांची जीप वेगाने धावू लागली.

तिन्हीसांज उलटून थोडासा वेळ गेला होता. आजूबाजूला काळोखाचे साम्राज्य हळूहळू पसरू लागले होते. सिंघावाला खेड्यातल्या घरातून लहान लहान दिवे लुकलुकू लागले होते. इन्स्पे. हझारासिंगांनी घड्याळ पाहिले. जीपचे हेड लाईटस् चालू केले आणि अरुंद रस्त्यावरून वळणे घेत जीप वेगाने धावू लागली होती. प्रत्येक वळणावर इशारा म्हणून हॉर्न वाजत होता. आठला पाच मिनिटे कमी असतानाच सिंघावाला खेड्यात रस्त्यावरचा धुरळा उडवीत जीप वेगाने गावात शिरली. जीपचा वेग थोडासा कमी करून रस्त्याच्या कडेला उभ्या झालेल्या एका खेडुताला पहाडी आवाजात इन्स्पे. हझारासिंगानी गज्जनसिंगाचा पत्ता विचारला. अर्धवट शब्द उच्चारून आणि अर्धवट हाताने, पोलिसांना पाहून स्वत: उगाचच घाबरलेल्या त्या खेडुताने गज्जनसिंगाचे घर थोडे पुढे असल्याचे दर्शविले. क्षणार्धात जीपचा वेग पुन्हा वाढला आणि ब्रेकचा कर्कश आवाज काढून अचानक जीप जागच्या जागी थांबली. थांबल्यानंतर देखील जीप मागे-पुढे हलत होती !

कमरेला लावलेल्या पिस्तुलावर एक हात ठेवून इन्स्पे. हझारासिंगांनी जमिनीवर उडी मारली आणि उतरण्यापूर्वीच हातात घेतलेल्या पॉवरफुल बॅटरीचा प्रकाशझोत टाकला. त्यांच्या पाठोपाठ आणखी एक पोलिस अधिकारी आणि अनेक पोलिस आपापल्या बॅटऱ्या चालू करीत शिस्तीत खाली उतरले. अनेक बॅटऱ्यांच्या प्रकाशाने आजूबाजूचा प्रदेश उजळून निघाला ! इन्स्पे. हझारासिंग तडक गज्जनसिंगाच्या घराकडे धावले... आणि दुष्ट शंका खरी ठरलेली त्यांना दिसली !

गज्जनसिंगाच्या घराच्या ओटीवर दोन–तीन कंदील लावून ठेवलेले होते... आणि घरासमोरच्या अंगणात गज्जनसिंगाचे प्रेत अस्ताव्यस्त पडले होते. त्याच्याजवळ बसून त्याची बायको ऊर बडवून घेत होती. त्याचा अल्पवयीन मुलगा भीतीने

रडत होता. उजवा गुडघा वाकवून इन्स्पे. हझारासिंगांनी वीरासन घातले आणि गज्जनसिंगाचा मृतदेह त्याला हात न लावता निरखून पाहायला त्यांनी सुरुवात केली. 'पोलिस आले' या नुसत्या बातमीनेच गज्जनसिंगाच्या प्रेताभोवतीची गर्दी पोलिस प्रत्यक्ष येण्यापूर्वीच हटली होती. गज्जनसिंगाच्या शरीरात बंदुकीच्या अनेक गोळ्या घुसल्या होत्या. गोळ्या लागलेल्या ठिकाणी फार रुंद जखमा होत्या. प्रेताची तपासणी करता करता इन्स्पे. हझारसिंगांच्या सहज एक गोष्ट ध्यानात आली की, गोळ्या अगदी जवळून मारल्या गेल्या असल्या पाहिजेत. गज्जनसिंगाच्या मृत देहापासून दूर होऊन इन्स्पे. हझारासिंगांनी बॅटरीचा झोत आजूबाजूला टाकायला सुरुवात केली. थोड्याच अंतरावर पडलेला एक देह विव्हळत होता. हरजितसिंग अजून जिवंत होता तर ... ! जवळ जवळ धावतच इन्स्पे. हझारासिंग त्या विव्हळणाऱ्या देहावर बॅटरीचा प्रकाश टाकल्यानंतर इन्स्पे. हझारासिंग आश्चर्याने जागच्या जागी थांबले ! तो विव्हळणारा देह निरंजनसिंगाचा होता ! निरंजनसिंग – कर्तारसिंगाच्या बायकोला फितवून तिचा 'प्रेमपात्र' म्हणून अभिमानाने उल्लेख करणारा निरंजनसिंग – बचावला होता. डाव्या पायाला झालेली जखम त्याने दोन्ही हातांनी दाबून धरली होती व डोळे घट्ट मिटून घेऊन तो जखम असह्य असल्याचे सुचविणारे विचित्र आवाज तोंडाने काढत होता. इन्स्पे. हझारासिंगांची नजर आणखी कशाचा तरी शोध घेत होती. त्यांच्या हातातला प्रकाशझोत अचानक स्थिर झाला ! गज्जनसिंगाच्या घराजवळच्या गल्लीमध्ये आणखी एक शरीर रक्ताच्या थारोळ्यात पडले होते ! इन्स्पे. हझारासिंगांनी आपला मोर्चा गल्लीकडे वळवला. त्यांच्या पाठोपाठ पोलिसपार्टी त्यांचा आदब राखून चालू लागली. गल्लीच्या तोंडावर शरीराची चाळण झालेला हरजितसिंग तोंड आणि डोळे उघडे ठेवून मरून पडला होता. तोंडातून बाहेर आलेल्या रक्ताचे ओघळ त्याच्या चेहऱ्यावर वेडेवाकडे पसरले गेले होते ! असली दृश्ये इन्स्पे. हझारासिंगांना नवीन नव्हती ! हरजितसिंगाच्या प्रेताचे निरीक्षण करता करता त्यांच्या मनात एकदा येऊन गेलेल्या विचारांची पकड अधिक घट्ट झाली, 'गोळ्या फार जवळून घातल्या गेल्या असल्या पाहिजेत.'

इन्स्पे. हझारासिंगांनी गज्जनसिंगाच्या घराभोवती फेरी मारण्यास सुरुवात केली. डाव्या अंगाच्या झुडपांत रिकामी काडतुसे टाकून दिलेली त्यांना आढळली. आणि इन्स्पे. हझारासिंगांनी मनात आणखी एक खूणगाठ बांधली. हल्लेखोरांनी रिकामी झालेली बंदुक पुन्हा असली भरली पाहिजे. आणि हे काम झटपट करायचं अर्थातच हल्लेखोर एकापेक्षा जास्त असले पाहिजेत.

खून दिवसाढवळ्या झाले होते ! फार जवळून झाले होते. खून जाणून बुजून आणि हेतुपुरस्सर केले गेले होते आणि आणि हे काम दिवसा करणारी माणसं धाडसी असली पाहिजेत. एवढा प्रकार घडेपर्यंत मारेकऱ्यांपैकी एकाला तरी प्रत्यक्ष पाह-

णारा इथे कोणीतरी असलाच पाहिजे ! इन्स्पे. हझरासिंगांनी दूरवर दृष्टी टाकली. पोलिसांच्या भीतीने दूरवर जाऊन उभ्या असलेल्या आणि तिथूनच उत्सुकतेने पोलिसांच्या हालचाली न्याहळणाऱ्या गावकऱ्यांपैकी कोणालातरी जवळ बोलवावे, असा विचार त्यांच्या मनात येऊन गेला आणि अचानक त्यांनी तो विचार रद्द केला ! जखमी झालेला निरंजनसिंग अजून जिवंत होता. त्याने मारेकऱ्यांना नक्कीच पाहिले असले पाहिजे. त्याची जबानी अगोदर घेतलेली बरी, असा विचार करून इन्स्पे. हझरासिंग निरंजनसिंगाकडे वळले.

टेलिफोनवरून अज्ञात व्यक्तीने हरजितसिंगाच्या व गज्जनसिंगाच्या खुनांची खबर दिल्या क्षणापासूनच इन्स्पे. हझरासिंगांच्या मनात कर्तारसिंगाचे नाव घोळत होते. प्रत्यक्ष खून कसे घडले असतील, याचे चित्र डोळ्यांपुढे आणल्यानंतर तर कर्तारसिंगाबद्दल त्यांचा संशय दुणावला होता. इन्स्पे. हझरासिंग हे एक नावलौकिक असलेले मुरब्बी पोलिस अधिकारी होते. एकंदर परिस्थिती वरवरच पाहून अमूक एक व्यक्तीच गुन्हेगार असली पाहिजे असं धरून चालून गोळा केलेला पुरावा शेवटी फुकट जातो. पुरावा गोळा करण्याची ही पद्धत साफ चुकीची आहे, असं त्यांचं स्पष्ट मत होतं. कधी कधी प्रत्यक्षात खून करणारी व्यक्ती अगदी वेगळीच असते व आपण खून केला तरी संशयावरून भलताच मनुष्य पकडला जाईल, अशी त्या व्यक्तीची खात्री असते. चौकशी करणारा अधिकारी बहुधा चौकशीच्या याच टप्प्याला चूक करतो ! संशयित इसमांविरुद्ध ओढून ताणून पुरावा गोळा केला जातो व शेवटी संशयित आरोपी निर्दोष सुटतो. खरा खुनी कुठेतरी सुखाने वावरत असतो ! सगळे कष्ट फुकट जातात आणि कोर्ट चौकशी-अधिकाऱ्याला ठपका देतं ! संशयित इसम म्हणून एखाद्याचे नाव मनात आल्यास ते चौकशी करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याने जरूर लक्षात ठेवावे. पण त्याने खून केलाच असेल असे धरून चालू नये ! जिथे प्रत्यक्ष खून घडतो तिथे 'आरोपी' कुठलातरी बारीक सारीक पुरावा सोडून जातोच ! ते टोक पकडून चौकशीला सुरुवात करायची. त्याच्या पुढची पायरी गाठायची. पुन्हा पुन्हा आपण योग्य त्या दिशेनेच चाललो आहोत ना, याची खात्री पटवायची. उकल सोडवीत जायचे व पुराव्याच्या दिशने पुढे सरकत जाऊन दुसऱ्या टोकाभोवती उभ्या असलेल्या व्यक्तीच्या मानेभोवती आपला दणकट पोलिसी पंजा आवळायचा—मग तो संशयित इसम असेल तर फारच उत्तम ! हा इन्स्पे. हझरासिंगांच्या चौकशीचा नेहमीचा यशस्वी मार्ग होता !

आतादेखील निरंजनसिंगाची जबानी लिहून घेत असताना – कर्तारसिंगाचे नाव मनात घोळत असूनदेखील – कर्तारसिंगाचे नाव सूचित केले जाईल, असा एकही प्रश्न ते विचारीत नव्हते.

" आज दुपारनंतरची गोष्ट साहेब ऽऽ ! " पोलिसांच्या हजेरीमुळे बराच धीर आलेला निरजनसिंग सांगत होता......                [ अपूर्ण ]

# भिंतीच्या वैंबड्या

सुधाकर राजे

## □ मला मिळालेले जोडे

" दारिद्र्य मरण यातुनि मरण वरे वा दरिद्रता खोटी, " असे लिहिणाऱ्या कवी-वर बहुधा दिल्लीच्या कॅनॉट प्लेसमध्ये जोडे विकत घेण्याचा प्रसंग आला असावा. परवा माझ्यावर तो प्रसंग आला अन् वाटले अनवाणी वैऱ्यावरही असा प्रसंग येऊ नये. खरे म्हणजे माझे जुने (पुराणे) जोडे पेन्शनीत निघाले असले तरी सरकारी रिवाजाप्रमाणे मी त्यांना किमान वर्षभर तरी एक्स्टेंशन द्यायचे ठरवले होते. कारण डाव्या जोड्याच्या तळाला पडलेले भोक कुणालाच कळण्यासारखे नव्हते, अन् उजव्या बुटाची उसवलेली शिवण कोपऱ्यावरच्या चांभाराने इतकी बेमालूम शिवली होती की मी खूष होऊन त्याला दहा पैशाच्याऐवजी चक्क बारा दिले होते. दोन्ही जोड्यांच्या टाचा वधूपित्याला शोभतील इतक्या घासलेल्या असल्या तरी त्यांची अजून समूळ फारकत झालेली नव्हती. तात्पर्य काय, मी आणि माझे जुने जोडे, अशी जोडी आणखी वर्षभर टिकायला माझ्या मते काहीच हरकत नव्हती.

—माझ्या मते......! तिथेच ग्यानबाची मेख होती. कारण मॅन् प्रपोझेस्, वूमन डिस्पोझेस्. एका घातवारी स्वतःसाठी चार-पाच फॅन्सी चपलांचे जोड घेऊन झाल्या-वर आमच्या हिचे चुकून माझ्या बुटांकडे लक्ष गेले. " इश्य ! " नाक मुरडून ही म्हणाली, " हे असले बूट घालून तुम्ही माझ्याबरोबर चालणार ? ते काही नाही ! उद्या एक तारीख आहे, हपिसातून येताना आधी नवे बूट घ्या अन् मग घरी या. " हुकुमाप्रमाणे मी निमूटपणे दुसऱ्या दिवशी वाटेत कॅनॉट प्लेसमध्ये थांबलो. खरं म्हणजे कुठल्याही कारकुनाने कॅनॉट प्लेसच्या भपकेबाज बाजारात विंडो-शॉपिंग सोडून इतर कुठलेही शॉपिंग करायला कायद्यानेच सक्त मनाई असावी; कारण कायद्याचे काम मूर्खांचे स्वतःपासून रक्षण करणे हे आहे, असे म्हणतात. पण दुर्दैवाने कायदा स्वतःच गाढव असल्याने त्याला इतका शहाणपणा सुचलेला दिसत नाही. त्यातून आधी जाते डोक्यातली बुद्धी मग जाते खिशातले मांडवल, या न्यायानुसार मला नेमकी " जूनेजा आणि कंपनी "च्या राजेशाही दुकानात पाऊल ठेवण्याची अवदसा आठवली.

डोळ्यावर त्या वेळी एक तारखेचा कैफ होता, त्यामुळे पुढे काय झाले हे आता नक्की आठवत नाही. एवढेच अंधुक आठवते की वेगात मराठे वीर दौडले सात या धर्तीवर मी दुकानाचा दरवाजा लोटल्याबरोबर दोन-तीन माणसांनी धावत पुढे

येऊन माझे आगत-स्वागत केले. थोड्याफार फरकाने चांभाराचाच धंदा करणाऱ्या त्या मंडळींचे कपडे माझ्यापेक्षा बरेच झकपक होते तरी त्याच्याकडे दुर्लक्ष करून त्यांनी मला इतमामाने मऊ मऊ सोफ्यावर बसविले आणि माझ्यासमोर निरनिराळ्या उंची जोड्यांचा मीना बाजार मांडला. भांबावलेल्या मन:स्थितीत मी त्यातल्या त्यात स्वस्त (–चुकलो, कमी महाग) वाटणारी जोडी पसंत केली अन् किंमत विचारली.

" किंमत ? फक्त सत्तेचाळीस रुपये साडे नव्याण्णव पैसे. . . . ."

मी सुमारे अर्धा डझन वेळा आवंढा गिळला आणि वधस्तंभाकडे नेण्यात येणाऱ्या अजापुत्राच्या मुद्रेने पैसे हातावर ठेवले. पैसे दिले खरे– पण जोड्यांचा डबा हातात मिळेना. " द्या तो इकडे," मी म्हटले. " छे, छे ! असे कसे होईल ?" अंगावर झुरळ पडावे त्याप्रमाणे दचकून तो माणूस म्हणाला. " आपली मोटारगाडी कोणती तेवढी दाखवा म्हणजे आम्ही डबा आत ठेवू. . . . !"

" मोटारगाडी... ? माझी... ?"

दुकानाच्या पिछाडीला सायकल–स्टँडवर ठेवलेल्या माझ्या जुन्या सायकलीचे मी नामस्मरण केले आणि मनात कधी नाही तो परमेश्वराचा धावा केला...' देवा हत्ती-सारख्या एका जनावरालादेखील तू मगरीच्या कचाट्यातून सोडविलेस. मी तर कारकून, म्हणजे जवळ जवळ माणूसच ! तेव्हा मला आता या दुकानदाराच्या कचाट्यातून सोडव...... '

हातात माझ्या नवीन जोड्यांचा डबा परजीत दुकानातला माणूस एकीकडे बाहेर रांगेने उभ्या असणाऱ्या मोटारींकडे पाहत होता व दुसरीकडे मला विचारीत होता– " कुठली बरे आपली गाडी ?"

आता मला अक्षरशः झेंडू फुटला. " न–न–नाही, म्हणजे त्याचे काय आहे." मी चाचरत सुरुवात केली, " गाडी जरा दूर ठेवलीय्...मी घेऊन जातो ऽ ..."

पण माझ्या पसरलेल्या हाताला चुकवीत दुकानदाराचा माणूस म्हणाला " त्यात काय झाले ? आम्ही येऊ तिथपर्यंत !" आता मात्र " सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति " अशी अर्जुनाची दशा कशी झाली असावी, याचा मला अनुभव आला.


" न–नको, नको, नको, !" मी कसेबसे म्हटले अन् जोरजोराने मान हलवली. खरे म्हणजे कापरे भरल्याने मान आधीच लटलटत होती. माझी नजर आता माझ्या मालकीच्या झालेल्या पण तरीही मला न मिळणाऱ्या माझ्या नवीन जोड्यांवर खिळली होती. मग तुळजापूरच्या भवानीचे नाव घेऊन मी शिवाजी महाराजांच्या वडाडीने पुढे चाल केली अन् डबा काबीज करून चक्क भुरट्या चोराप्रमाणे धूम ठोकली.

सायकल स्टँड गाठला, कपाळाचा घाम व तोंडाचा फेस पुसला अन् सायकलवर टांग मारली. मैलभर जोरजोराने पॅडल मारल्यावरही मी धास्तावून सारखा मागे वळून पाहत होतो.–त्या दुकानदाराला माझ्या ' मोटारी ' चा मेक दिसला तर नसेल ना.....?

●

प र प ळ नू न

व न्स ए थी फ



# ॲलन डेलन

काही माणसांच्या पायांवर जन्मत:च चक्र कोरलेले असते की, काय कुणास ठाऊक ? कारण, त्यांची भ्रमंती सारखी चालूच असते, ॲलन डेलन ह्या अभिनेत्याच्या आयुष्याकडे पाहिले म्हणजे वाटते की, ॲलनच्या पायांवर नक्कीच असे चक्र असावे· कारण, १९५७ साली चित्रपटसृष्टीत प्रवेश केल्यापासून या ना त्या चित्रपटाच्या शूटिंगच्या निमित्ताने त्याला देशोदेशी फिरावे लागले आहे व आजही त्याची ही धावपळ चालूच आहे. हॉलिवुडच्या अनेक गाजलेल्या नटांबरोबर भूमिका करण्याची संधी त्याला मिळत आहे व त्याचा तो योग्य उपयोग करून घेत आहे. इकडे, तिकडे धावत आहे. ॲलनच्या जीवनाला आता जणू कमालीची गती आली आहे.

ॲलनचा जन्म ८ नोव्हेंबर १९३५ साली सिऑक्स ह्या पॅरिसच्या एका उपनगरात झाला. वास्तविक ॲलनचे कुटुंब हे एक सुखी कुटुंब होते. परंतु नंतर त्याच्या आई-वडिलांनी घटस्फोट घेतला आणि अनर्थपरंपरेला सुरुवात झाली. सैन्यातील नोकरी सोडून तो पॅरिसला आला व बेकारीपोटी त्याला कामाकरिता अक्षरश: वणवण फिरावे लागले. त्या काळात त्याने वेटर, ऑफिसबॉय सेल्समन अशा अनेक नोकऱ्या केल्या व अखेरीस पॅरिसमधील लेसहेलस ह्या उपनगरातील एका मोठ्या दुकानात तो हमालीचे काम करीत असतानाच त्याच्या नशिबाने पलटी घेतली.

एक फ्रेंच अभिनेत्री आपल्या सहकाऱ्यांसह काही खरेदीसाठी ह्या स्टोअरमध्ये आली. हे टोळके केन्स येथील फिल्म फेस्टिव्हलसाठी चालले होते. ह्या अभिनेत्रीने ॲलनला तेथे पाहिले व त्याच्या आकर्षक व्यक्तिमत्त्वाने जणू तिला भुरळ घातली. तिने त्याला आपल्यावरोबर चलण्याचे आमंत्रण दिले. ॲलन तेथे गेला. एकदा फेस्टिव्हल हॉलच्या पायरीवर तो बसलेला असताना निर्माते डेव्हिड ओ सेल्झनिक यांच्या प्रतिनिधीच्या डोळ्यात तो भरला.

हॉलिवुडला त्याची 'स्क्रीन टेस्ट' घेतली गेली आणि एका चित्रपटाचे 'कॉंट्रॅक्ट' त्याच्यापुढे करण्यात आले. ही बातमी विजेच्या वेगाने सगळ्या चित्रपटक्षेत्रात पसरली व फ्रेंच निर्माते यूवेस ॲलीग्रेट यांनी त्याला फ्रेंच चित्रपटात काम देऊ केले. ॲलनने फ्रेंच चित्रपटातील काम स्वीकारले कारण, त्या वेळी त्याचे इंग्लिश उच्चार एवढे चांगले नव्हते व त्यासाठी थोडा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे असे त्याला वाटले. अभिनयाची काही आवड नसताना त्याला अभिनेता बनावे लागले. पण पहिल्या चित्रपटापासूनच त्याने फ्रान्समध्ये अमाप लोकप्रियता मिळविली आहे. 'फ्रान्सचा जेम्स डीन' 'Heart of France and Italy' अशा शब्दांत त्याचा गौरव केला जातो. यावरूनच काय ते समजून येईल.

केवळ फ्रान्स व इटलीलाच नव्हे तर अमेरिका व इंग्लंडलादेखील त्याने आपल्या अभिनय-सामर्थ्याने भुलवून टाकले आहे.

ग्रेगरी पेक नंतर इतके देखणे व्यक्तिमत्त्व अभावानेच रजतपटावर आले. 'पर्पल नून' ह्या चित्रपटामुळे तर त्याला जगभर प्रसिद्धी मिळाली व त्यानंतर एम्. जी. एम्. सारख्या मातब्बर संस्थेनेदेखील त्याला घेऊन जेन फोंडासारख्या प्रसिद्ध अभिनेत्रीबरोबर काम करण्याची संधी दिली.

१९५७ ते १९६६ या फक्त ९ वर्षांच्या काळात त्याचे इंग्लिश-फ्रेंच-इटालियन मिळून १८ चित्रपट प्रकाशित झाले आहेत यावरूनच त्याची लोकप्रियता कळून येईल. याचे कारण ॲलनचे उमदे आकर्षक व्यक्तिमत्त्व, सव्वा सहा फूट उंचीची त्याची ती बांधेसूद मूर्ती, कपाळावर विखुरलेले केस, सरळ नाक व बोलके डोळे....आणि जन्मजात असलेली अभिनयाची जाण यामुळे ॲलनची प्रत्येक भूमिका जणू सजीव वाटते. 'वन्स अ थीफ्'मधील त्याचा मरत्या वेळेचा अभिनय कोणी आठवून पाहिला तर त्याला ह्या म्हणण्याचे प्रत्यंतर येईल. त्याचा कुठलाही चित्रपट पाहताना भूमिका साकार करण्यासाठी तो घेत असलेले कष्ट, निरीक्षण हे सारे जाणवते व चित्रपट संपल्यानंतर एकच गोष्ट मनात ठसून राहते ॲलनचा जिवंत अभिनय.

ॲलनचे व्यक्तिमत्त्व व भूमिका साकार करण्याची पद्धती आपल्याकडील दिलीप-कुमारसारखी आहे, असे म्हटल्यास दुमत होऊ नये.

काहीही असो, एके काळी रस्त्याने वणवण भटकणारा हा तरुण आज विमानाने भटकत आहे. पण आज त्याच्या भटकण्याला निराळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. एके काळी लहानशा घरात राहणारा ॲलन आज पॅरिसला अक्षरशः प्रासादात राहत आहे. ट्रिलपोर्ट येथे देखील त्याचा एक महाल असून तेथे त्याने आपल्या आवडत्या १३ कुत्र्यांना ठेवले आहे. कुत्री पाळणे हा त्याचा आवडता छंद आहे तसेच चित्रपटातील धोकादायक कामे देखील 'डमी' न वापरता स्वतःच करण्याचा त्याला छंद आहे.

–जयंतकुमार त्रिभुवन

●

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**
सायनाचार्य, नासिक
दि. १४ ते २० जानेवारी १९६७

**मेष** :– रवि-शुक्र दशमात एवढ्या भांडवलावरही तुम्ही घवघवीत यश मिळवू शकाल. बाराव्या शनीची धास्ती न बाळ-गता निर्धाराने वाटचाल करू लागलात तर हेवा करण्यासारखी प्रतिष्ठा पदरी पाडून घेऊ शकाल.

तुमचा प्रतिस्पर्धी मातवर आहे हे लक्षात घेऊन निवडणुकीच्या आखाड्यात उतरा. थोडे गाफील राहिलात तरी हित-शत्रू तुमच्या वेंधळेपणाचा फायदा उच-तील. हे दिवस अपयशाचे खास नाहीत पण सावधानतेचे निश्चित आहेत. सांप-त्तिक ताण खूपच वाढेल, वाढत्या खर्चाला आळा घालण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करा.

दि. १५–१६ फार मोठ्या उलाढाली या काळी घडतील.

**वृषभ** :– पंचमातील हर्षलाच्या अचाट सामर्थ्याचा प्रत्यय याच वेळी यावा. अंगीकृत व्यवसायात प्रचंड उलाढाल्या घडवील, निवडणुकीच्या क्षेत्रात अनुकूलतेचे वारे वाहू लागतील. पैसा अमाप मिळेल. प्रतिष्ठा खूप उंचावेल. तुमचा सारा अनिष्ट काल इतिहासजमा झाल्यासारखे जाणवेल.

साहित्य–कला हे तुमचे खासक्षेत्र. त्यात चिरंतन स्मृतीच्या अनेक घटना घडून येतील. तुमचे प्रतिस्पर्धी तर मागील दाराने केव्हाच पसार झालेले असतील.

प्रतिज्ञेने विजय मिळविण्याचा हा

काल आहे. राजकीय आघाडीवर राहण्याचा मान मिळेल, आणि याच काली व्यावसायिक कर्तृत्वही धारदार बनेल.

दि. १६ ते १८ या कालात तर सारे लक्ष केंद्रित करा.

**मिथुन** :— चौथ्या मंगळाची डोकेदुखी आता संपली. संपल्यासारखीच आहे. आता रेंगाळणे, माघार घेणे, कच खाणे हे सारे मनोविकार आपण विसरू शकता. राजकीय क्षेत्रातील प्रतिस्पर्ध्याला आव्हान द्यायला आता कचरू नका. तुमच्यातील ज्वलंत निष्ठा तुम्हांला आवाहन करू लागेल की, "पुढे व्हा, यश तुमचेच आहे !"

व्यावसायिक योजना आता गती घेऊ लागतील, यश दार ठोठावू लागेल. प्रतिष्ठा सहजासहजी मिळू लागेल. धार्मिक कार्यात हिरीरीने भाग घ्याल, निवडणुकीचे राजकारण रंगवू लागाल. पैसा—आरोग्य या संबंधीच्या विवंचना मिटून जातील, तुमची आजवरची खडतर तपस्या फळाला येईल.

दि. १८ ते २० या कालावर दृष्टी केंद्रित करा.

**कर्क** :— चौथ्या खडतर मंगळाची चाहूल लागली आहे. दि. २२ ला त्याची खरी जाणीव व्हायला लागेल. अविश्रांत परिश्रमाने आजवर जे केले, करविले त्यावर पाणी पडण्याचा प्रसंग ओढवेल. याच वेळी. संयम—निष्ठेची नितांत गरज भासेल.

या कालात व्यवहारधंद्यात राजकारणात धाडसी प्रयोग करण्याच्या फंदात पडू नका. परिस्थितीचा अंदाज घेऊन वागणेच शहाणपणाचे ठरेल.

स्थावराचा प्रश्न चिघळेल. नोकरीतील प्रगती हुकेल. काही काळ लक्ष्मीही रुसेल. या कालात प्रकृतीला, विशेष जपायला हवे. इष्टमित्राशी संघर्ष निर्माण व्हायला नको म्हणून सावधानता बाळगायला हवी.

दि. १५ ते १८ बराचसा अनुकूल काल.

**सिंह** :— सिंह राशीची माणसे सदैव आघाडीवरच राहावीत अशी नियतीची इच्छा असते. त्यातून मंगळासारखा कर्तृत्वसंपन्न ग्रह तुमच्या पराक्रमस्थानाकडे यायला निघालेला आहे. या वेळी आकाश ठेंगणे वाटेल. तुमच्या प्रतिष्ठेच्या उंचीपुढे हिमालय थिटा वाटेल.

तुमचे राजकारण खरे रंगेल येथूनच. विरोधकांच्या छातीत धडकी भरेल असे काही अचाट कार्य करून दाखवाल. बारावा गुरू, आठवा शनी म्हणून कच खाऊ नका. भविष्यकाल तुमचाच आहे.

राष्ट्रीय कार्यक्रमात अग्रभागी राहाल, व्यवहारधंद्याला रंगरूप आणाल, सामाजिक क्षेत्रात राजकीय क्षेत्रात विजयावर विजय मिळवाल.

दि. १८ ते २० हा काल नोंद करून ठेवा.

**कन्या** :— खटयाळ मंगळाचे तुमच्या राशीतून उच्चाटन होणार ही बातमी कळल्यानेही तुम्हाला हुरूप येईल. अकराव्या गुरूची दिव्यता आणि मांगल्य आता

येथूनच पुढे प्रकर्षाने प्रत्ययास येईल. हाती नवे क्षेत्र गवसेल, कोणत्याही कार्यक्रमात प्रतिज्ञेने यश मिळवाल. गुरु-शनी त्रिकोणाचा हा पर्वकाल सुरू आहे. अकरावा गुरू आणि सातवा शनी अगदी असाच काल ६० वर्षामागे घडून आला होता. म्हणूनच मला आपणांस असे आवर्जून सांगावेसे वाटते की, या वेळी असे काही करा व केले जाईल की, जे चिरंतन स्मृतीचे ठरेल.

अपेक्षित विजय निश्चित मिळेल, पैसा अनक मार्गांनी हाती येऊ लागेल. समर्थाचे सहकार्य लाभेल.

दि. १५ ते ३९ अत्युत्तम काल.

**तूळ** :–दि.२२ जानेवारीला बाराव्या मंगळाची कारकीर्द संपुष्टांत येणार आहे, ही बातमी कळल्यामुळेही तुमचे चेहरे प्रसन्न दिसू लागतील. या मंगळामुळे खर्चाला काही ताळतंत्रच राहिला नाही.

आता गुरूचे दातृत्व आणि शनीचे कर्तृत्व प्रत्ययास यायला लागेल. पाय मागे ओढणारे हितशत्रू तुम्हांला सहकार्य करण्यासाठी उद्युक्त होतील, कधी न भेटणारी माणसे प्रसन्न मनाने स्वागत करायला लागतील. व्यावसायिक बाजूही चांगलीच भरभक्कम बनेल, वाढत्या खर्चाचा लोंढा थोपविण्यात यशस्वी ठराल. निवडणुकीच्या वातावरणात आत्मीयतेने भाग घ्याल. तुमचा अनिष्ट काळ आता इतिहासजमा झाल्यासारखाच आहे.

दि. १५ ते १७ या कालावर दृष्टी ठेवा.

**वृश्चिक** :–सूर्य पराक्रमात आणि हर्षल लाभात, या विशाल तेजोगोलाचा त्रिकोण तुमच्या चारित्र्यात भव्यता-दिव्यता निर्माण केल्याशिवाय राहणार नाही. दि. १५ जानेवारीपासूनच उज्ज्वल भविष्यकालाची प्रसादचिन्हे आपणास दिसू लागतील. ध्यानी-मनी नसणारे अनपेक्षित लाभ याच वेळी उठवता येतील, मी मी म्हणणाऱ्या बड्यांना मागे सारून पुढे जाल आणि नवा प्रांत संपूर्णपणे हस्तगत कराल. तुमच्या कर्तृत्वाची नवी झलक याच वेळी जगाला दिसू लागेल.

तुमचे क्षेत्र कोणतेही असो त्यात विजयावर विजय मिळवून जगात नवा विक्रम प्रस्थापित कराल. आणि या तुमच्या अनन्यसाधारण यशामुळे जगाच्या नजरा तुमच्याकडे वळू लागतील.

दि. १५ ते १८ या कालाची नोंद करा.

**धनू** :–आपले जीवन निश्चितपणे प्रगतीकडे वाटचाल करू लागलेले आहे. चौथ्या शनीमुळे त्याला फारशी गती लाभलेली नाही. अडखळत, ठेचाळत, धडपडत पण पुढे पुढे चाल करीत आहें.

या आठवड्यातील रवि-हर्षल त्रिकोण, आपल्या जीवनात काही नव्य-दिव्य प्रकट करील अशी मला खात्री वाटते. यांत्रिक-विद्युत क्षेत्रातील व्यक्तींना तर ती पर्वणीच वाटेल.

अनपेक्षितपणे खूप पैसा हाती येईल, प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील. राजकीय क्षेत्रातही भावी प्रगतीची बीजे अंकुरायला लागतील.

हा महिना खूपच घाईगर्दीचा व धावपळीचा जाणवेल. घरोघर प्रचार करावा लागेल. अनेकांच्या भेटीगाठी घ्याव्या लागतील.

दि. १५-१८-१९ विशेष महत्त्वाचा काळ.

**मकर** :– आज मकर राशीचे लोकच अधिक भाग्यवान्. त्यातून मंगळासारखा एक प्रखर निष्ठावंत ग्रह दशमांत प्रवेश करणार आहे. वेगवान् प्रगतीचे गणित आता तुम्हांला सुटायला लागेल.

स्थावराचा, वाहनाचा, नोकरांचा प्रश्न आता झटपट सोडवू शकाल. अभिनव, अद्ययावत् असे एखादे कार्यक्षेत्र निर्माण कराल, प्रतिज्ञेने यश कसे मिळवावे याचे धडे तुमच्यापासूनच जगाने घ्यावेत.

नोकरीधंद्यात अनपेक्षितपणे फार मोठी प्रगती होईल. हितशत्रू मागीलदाराने पसार व्हायला लागतील. पैसा, प्रतिष्ठा, मानसन्मान अपेक्षेबाहेर लाभेल. तुमच्या जीवनातील परमोत्कर्षाचा काल हाच.

दि. १५-१८-२० या कालाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

**कुंभ** :–आठवा मंगळ आला आणि गेला. तसे पाहिले तर त्याने तसे तुमचे काही वाकडे केले नाही. याचे कारण एकच तुमचे उज्ज्वल चारित्र्य. चारित्र्यसंपन्न माणसाच्या वाटेला सहसा ग्रहही जायला धजत नाहीत म्हणतात त्याचा हा पुरावाच !

आता पुढच्याच आठवड्यात मंगळ तुमच्या भाग्यस्थानी प्रकटणार आहे. तो तुमच्या प्रगतीची गती वाढवील, स्थगित कार्यांना खरी चालना देऊ शकेल.

स्थानांतर, बदल, प्रवास यांपैकी काहीही आता घडावे. नव्या आशा अंकुरतील, नवे वातावरण आत्मसात कराल, प्रगत जीवन अनुभवू लागाल. सध्या तरी निदान तुम्हांला साडेसाती आहे नाही सारखीच.

दि. १५-१७-१९ अपेक्षा बऱ्याच प्रमाणांत सफल व्हाव्यात.

**मीन** :–शनी-मंगळांनी तुमचा पाठपुरावा केलाय. दगदग, ओढाताण, मानसिक त्रास असले अनेक प्रकार आपण कित्येक दिवसांपासून अनुभवीत आहोत. असे असूनही माघार, अपयश, पराभव यांबद्दल आपणास यत्किंचितही भीती बाळगण्याचे कारण नाही.

दि. १५ चा सूर्य-हर्षल त्रिकोण तुमच्या कार्यक्षेत्रात काही अघटित, अनन्य-साधारण असे घडवून आणील, व्यवसायक्षेत्र विस्तारेल. विचार धारदार बनू लागतील. व्यावहारिक संघर्ष मिटून दिलजमाई होऊ लागेल. पण हे सारे घडेल अविश्रान्त परिश्रमानंतर !

दि. १५-१६-१७ विशेष प्रगतीचे दिवस

●

# लोकशाही समाजवादाचे प्रामाणिक प्रशासक

**स. गो. बर्वे** [पृष्ठ २७ वरून]

चुका केल्या तरी ५–७ वर्षांत आपण अडचणीतून बाहेर पडू शकू, एवढा आपला पाया पक्का आहे. आणि चुका तपशीलाच्या आहेत. प्रगतीचा मोहरा योग्य दिशेलाच आहे."

पण लोकशाहीबाबतच्या या वाटचालीत "आपणाला मिळावे तसे यश मिळाले नाही," असे श्री. बर्वे कबूल करतात. "राजकीय पातळीवरील दोष, पक्षसंघटनेतील ढिसूळपणा, सदोष राज्यकारभारपद्धती" आदी कारणे ते या अपुऱ्या यशासाठी पुढे करतात. ते म्हणतात, "या अपयशाचे आणखी एक कारण म्हणजे लोकांचा आपल्या योजनांबद्दल असलेला निरुत्साह हे आहे. काँग्रेस पक्षाने विकासाच्या आखलेल्या योजनांना जनतेकडून उत्साहाने सहकार्य मिळत नाही, याला कारण काँग्रेस पक्षातील मंडळींनी लोकांच्यात या योजनांबद्दल पुरेसे चैतन्य निर्माण केलेले नाही, हे मान्य करायला हवे."

आजपर्यंतच्या नियोजनाने देशाचे बरेच प्रश्न सुलभ झाले आहेत, असे सांगून श्री. बर्वे म्हणतात, "आजचे प्रश्नच एवढे विराट आहेत आणि इतक्या वर्षांचे साचलेले आहेत की १५ वर्षांत ते सुटले नाहीत म्हणून कपाळाला हात लावून रडत बसलो तर ते योग्य होणार नाही."

## मेनन यांची आततायी भूमिका

व्यासपीठावर छाती बडवून समाजवादाच्या वल्गना करण्यापेक्षा समाजसुधारणेचे एकेक प्रयत्न जास्ती गतिशील, जास्ती प्रभावी, जास्ती विस्तृत कसे होतील याचा विधायक विचार करणे आणि त्या मार्गाने कार्यप्रवण राहणे हे श्री. बर्वे यांना जास्त उपयुक्त वाटते. त्यांचा स्वतःचा तसा प्रयत्न असतो. आणि म्हणून श्री. मेनन यांची आततायी भूमिका त्यांना मान्य होऊ शकत नाही.

"वास्तविक पाहता आमच्या या मेनन-काँग्रेस लढ्यात तात्त्विक संघर्ष गुंतण्याचे कारण नव्हते," श्री. बर्वे म्हणाले, "परंतु परवा परवापर्यंत काँग्रेसमध्ये उच्च पातळीवर राहून विरोधकांवर टीका करणारे मेनन आज बाहेर पडून काँग्रेसच्याच समाजवादावर टीका करताहेत याचा अर्थ काय? शिवाय त्यांना सतत मिळत असलेला कम्युनिस्टांचा पाठिंबाही त्यांच्या समाजवादाचा कल साम्यवादी आहे, हे स्पष्ट करतो. आणि म्हणून आमच्या या झुंजीला श्री. मेनन यांचा साम्यवादी समाजवाद विरुद्ध काँग्रेसचा लोकशाही समाजवाद असे अटीतटीचे स्वरूप आपोआपच प्राप्त झाले आहे."

श्री. मेनन यांच्या साम्यवादी समाजवादाचे स्वरूप सांगताना श्री. बर्वे म्हणाले,

"श्री. मेनन यांचा समाजवाद मोडतोडीचा, समाजाच्या उलथापालथीचा, आक्रस्ताळेपणाचा आणि हुकूमशाही असा आहे. भारतीय संस्कृतीशी आणि परंपरेशी हा समाजवाद पूर्णपणे विसंगत आहे. भारतीय जनता तो पचवू शकणार नाही. लोकशाही समाजवादच आज उत्कर्षाप्रत नेऊ शकेल."

बर्वे म्हणतात, "श्री. मेनन यांच्या आंतरराष्ट्रीय कामगिरीबद्दल मला आदर आहे. पण आपणाला हवे ते विवक्षित निर्वाचन क्षेत्रच निवडायचे हा त्यांचा हटवादीपणा आपल्याला मान्य नाही."

स्थानिक उमेदवाराचे नाव पुढे करून मला डावलले, असा श्री. मेनन आरोप करतात, याचा उल्लेख करून श्री. बर्वे म्हणाले, "ही धूळफेक आहे. यात तत्त्वाचा मुद्दाच नाही. मुख्य म्हणजे मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीवर संकुचितपणाचा आरोप करणे म्हणजे जरा आश्चर्यच आहे. मुंबई काँग्रेसचा बहुरंगीपणा सर्वश्रुतच आहे. महाराष्ट्रातील निर्वाचन क्षेत्रात महाराष्ट्रीयांनाही इतरांच्या बरोबरीचे तरी हक्क मिळाले पाहिजेत. नाहीतर श्री. मेनन यांच्या म्हणण्याप्रमाणे घरात राहण्याचा हक्क फक्त इतरांना आणि स्थानिक व्यक्तींना नाही असा प्रकार व्हायचा."

श्री. मेनन यांच्या साम्यवादी समाजवादाला श्री. बर्वे यांचा जसा विरोध आहे, तसेच काँग्रेसमधील पूंजीवादी आघाडीचेही त्यांना वावडे आहे. समाजवादी प्रेरणांची तरफदारी त्यांनी सातत्याने केली आहे. तसेच आपल्या पंचवीस वर्षांच्या सरकारी नोकरीच्या काळात व राजकारणात आपल्या चारित्र्यावर संशय घेण्यास त्यांनी यत्किंचितही जागा ठेवली नाही.

बोलताना श्री. बर्वे अतिशय तोलून मापून बोलतात. एकही अधिकउणा शब्द इकडे तिकडे पडू नये याची ते सतत खबरदारी घेत असतात. खाजगी संभाषणात आणि जाहीर भाषणांमध्येही. परंतु बोलण्यातून त्यांची तळमळ आणि त्यांचा त्या विषयावरील अभ्यास आणि त्यावर त्यांनी केलेले चिंतन ध्यानात येते. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक विषयांचे सतत चिंतन मनात करून आपले विचार सुसंगतपणे मांडीत राहणे ही भारतीय नेतृत्वातील परंपरा जात चालली आहे. श्री. बर्वे यांचे या परंपरेशी जुने नाते आहे. आपल्या भाषणांमधून तर ते आपले विचार सुसंगतीने मांडतातच; त्याचबरोबर लिखाणातूनही ते विचारमंथन करतात. त्यांनी लिहिलेली 'वुईथ मॅलीस टोवर्ड नन' आणि 'काँग्रेसच्या उंबरठ्यावर' ही पुस्तके बरीच गाजली. 'व्हाय काँग्रेस' आणि 'फ्रीडम अँड ऑर्गनायझेशन' ही त्यांची दोन पुस्तके नव्याने प्रसिद्ध होत आहेत.

## दिल्लीला गेल्यावर......

मुंबईतून लोकसभेवर निवडून गेल्यावर आपण काय करू हे सांगताना श्री. बर्वे म्हणाले, "भारतीय लोकशाहीला, एकात्मतेला पोषक असे महाराष्ट्राचे

काही खास गुण आहेत. त्यांचे योग्य प्रतिनिधित्व दिल्लीत झाले पाहिजे असे मला वाटते. " आज दिल्लीच्या राजकारणात भोंगळपणा, गलथानपणा फार वाढला आहे. महाराष्ट्राचा व्यवहारीपणा, शिस्त, परखड वृत्ती—आणि थोडासा हिरवटपणाही म्हणा हवा तर—हे गुण या भोंगळपणावर उत्तम औषध आहे. आतापर्यंत महाराष्ट्राच्या या गुणांचे पुरेसे प्रतिनिधित्व दिल्लीत झालेच नाही. इतर प्रतिनिधींवर यात मला आक्षेप घ्यायचा नाही. पण एकूणच महाराष्ट्राचे खरे प्रतिनिधित्व दिल्लीत कमी पडते असे मला वाटते. ते भरून काढण्याचा प्रयत्न करावा असा माझा नम्र प्रयास राहील. "

मुंबईचे नागरी प्रश्न आजवर उपेक्षित आहेत. ते प्रश्न आणि त्यावरील उपाय दिल्लीत मांडणे ही कामे आजपर्यंत क्वचितच पुरेशी केली गेली. मुंबईच्या पाण्याचा प्रश्न, गरिबांच्या, मध्यमवर्गीयांच्या घरांचा प्रश्न, वाहतुकीचा प्रश्न या साऱ्यांवर श्री. बर्वे यांनी पूर्ण विचार केलेला आहे आणि हे प्रश्न प्रभावीपणे मांडून ते सोडविण्याचा मार्ग आपण दाखवू शकू, असा त्यांना सार्थ विश्वास आहे.

श्री. बर्वे यांच्या लोकसभा मतदारसंघात मुंबईतील विधानसभेचे ४ मतदारसंघ आणि २ संघ मुंबईबाहेरचे ग्रामीण आहेत. त्यामुळे " माझे निर्वाचन क्षेत्र हे ग्रामीण व नागरी जीवन यांतील दुवा आहे, " असे ते म्हणतात. असे सार्थ व समर्पक निर्वाचन क्षेत्र अचानक मिळाल्याबद्दल त्यांना आनंद वाटतो.

निवडणूक प्रचाराची धमाल आता जोरात सुरू झाली आहे. रात्रंदिवस सभा, बैठकी, व्याख्याने, भेटीगाठी यांत जात आहेत. दोन्ही बाजूंचे प्रचारमोर्चे आता जय्यत तयारीने कामाला लागले आहेत. सगळ्या देशाचे लक्ष या गाजत्या लढतीकडे लागणार आहे.

मागील सार्वत्रिक निवडणुकीतही उत्तर मुंबईतील लोकसभेची लढत चांगलीच रंगली होती. आताही ती रंगते आहे. मागील निवडणुकीत बर्वे पुण्यातून विधानसभेवर निवडून आले होते. तीही निवडणूक चांगलीच गाजली होती. आता माणसे बदलली आहेत. जागा बदलल्या आहेत. दैवते बदलली आहेत. या धामधुमीत श्री. बर्वे यांचे दैव त्यांना कुठे नेते हे फक्त बघायचे. निर्णय काय होईल तो होवो. पण ध्येयावर निष्ठा ठेवून मेननसारख्या बलाढ्य असामीशी टक्कर देऊन यशस्वी होण्याची तयारी श्री. बर्वे करीत आहेत यातच त्यांचे कौतुक आहे.

●



# भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य रुपये पंचवीस

राजहंस प्रकाशन
४१९ नारायण, पुणे

MANOOS (Weekly) 40 Paise : Regd. No. M H–649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**